# ६ गांधी युगातील राष्ट्रीय चळवळ

## गांधीजींचे नेतृत्व आणि असहकार चळवळ

भारतीय राजकारणातील नेतृत्व टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीजींकडे गेले आणि भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळेपर्यंत राष्ट्रीय चळवळीचे गांधीजी हेच प्रमुख नेते राहिले. भारतात येण्यापूर्वीच गांधीजींचे नाव भारतीयांना, त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषाविरुद्ध दिलेल्या लढ्यामुळे परिचित झाले होते. गांधीजींच्या नेतृत्वाचा, त्यांच्या चळवळींचा आणि विचारांचा आढावा या आणि पुढील काही प्रकरणांत घेतला आहे.

**गांधीजींची दक्षिण आफ्रिकेतील कामगिरी**

इ. स. १८९३ मध्ये गांधीजी वकिलीच्या व्यवसायाच्या संबंधात दक्षिण आफ्रिकेत गेले होते. ही एक ब्रिटिशांच्या ताब्यातील वसाहत होती. तेथे गांधीजींनी वर्णद्वेषी गोऱ्या शासनाचा कृष्णवर्णीय जनतेवरील होणारा अन्याय व जुलूम पाहिला. त्यांना स्वत:लाही याचा अनुभव घ्यावा लागला. अनेक भारतीय दक्षिण आफ्रिकेत व्यापार, मजुरी इत्यादी कामांसाठी गेले होते. तेथील गोऱ्या शासनाने अनेक जाचक, मानहानीकारक निर्बंध भारतीयांवर घातले होते. तेथील भारतीयांना आपले बोटांचे ठसे असलेले ओळखपत्र बाळगणे सक्तीचे केले होते; तसेच दुसऱ्या एका कायद्याद्वारे तेथील सर्वधर्मीयांना त्यांच्या विवाहाला कायदेशीर करण्यासाठी, ख्रिश्चन पद्धतीने विवाह करून त्याची शासनाकडे नोंद करणे आवश्यक केले. भारतीयांसह सर्व कृष्णवर्णीयांना सार्वजनिक वाहनात, हॉटेल इत्यादी ठिकाणी विषमतेची वागणूक दिली जात असे. गांधीजींनी तेथील भारतीयांना संघटित करून शांततामय मार्गाने, सत्याग्रहाच्या द्वारे आपल्यावरील अन्यायाविरुद्ध लढा देण्यास उद्युक्त केले. लोकांनी लाठीमार, तुरुंगवास सहन केला; पण ते मागे हटले नाहीत. शेवटी दक्षिण आफ्रिकेच्या शासनाने भारतीयांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे मान्य केले. भारतात आल्यानंतर गांधीजींनी जी आंदोलने केली त्याचा प्रयोग त्यांनी दक्षिण आफ्रिकेत केला होता. यात सत्याग्रह, सविनय कायदेभंग इत्यादींचा समावेश होता.

**गांधीजींचे भारतभ्रमण**

इ. स. १९१५ च्या प्रारंभी गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले. काँग्रेसमधील एक ज्येष्ठ नेते गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सल्ल्यानुसार गांधीजींनी भारताच्या विविध प्रांतांत एक वर्ष प्रवास केला व भारतीय समाजाचे अवलोकन केले. या प्रवासात त्यांना विशेषत: भारतातील ग्रामीण समाज व या समाजाचे दारिद्र्य आणि इतर विविध प्रश्न यांची कल्पना आली. गांधीजींच्या पुढच्या जन-आंदोलनाला या निरीक्षणाचा उपयोग झाला. यानंतर आपला पाश्चात्त्य पोशाख सोडून देऊन गांधीजींनी धोतर आणि पंचा असा पोशाख धारण केला. हा केवळ पोशाखातला बदल होता असे नसून समाजाच्या स्थितीबद्दल असलेल्या आस्थेचे आणि एकरूपतेचे ते निदर्शक होते.

**बिहारच्या चंपारण्यमधील शेतकऱ्यांचा लढा**

बिहारच्या चंपारण्य भागात युरोपीय मळेवाल्यांनी भारतीय शेतकऱ्यांशी निळीची लागवड करण्याबद्दल करार केले होते. त्यानुसार शेतकऱ्यांना आपल्या शेतात नीळ पिकविणे भाग होते. चंपारण्यामध्ये तीन-कथिया पद्धती

होती. शेताच्या तीन-विसांश भागात शेतकऱ्यांना निळीची लागवड करावी लागे. शेतकऱ्यांना नीळ पिकविणे वेगवेगळ्या कारणांनी आर्थिक नुकसानीचे होते. एक तर निळीला भाव वाढवून मिळत नव्हता; निळीऐवजी दुसरे कोणतेही फायदेशीर पीक या करारामुळे घेता येत नव्हते; निळीमुळे जमीन नापीक होत होती इत्यादी; परंतु शेतकऱ्यांची या जाचातून सुटका नव्हती. युरोपीय मळेवाल्यांकडून नीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायावर 'नील दर्पण' हे नाटक लिहिले गेले होते. १९१७ मध्ये गांधीजींनी चंपारण्यामधील नीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रश्न हाती घेतला व त्याबद्दल शेतकऱ्यांकडून माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. नीळ पिकविण्याच्या करारातून मुक्त होण्यासाठी युरोपीय मळेवाल्यांनी बेकायदेशीर रक्कम शेतकऱ्यांना मागण्यास सुरुवात केली. ब्रिटिश शासनानेही एक चौकशी समिती या संबंधात नेमली. गांधीजींनी शेतकऱ्यांवर नीळ पिकविण्याची सक्ती करू नये आणि शेतकऱ्यांकडून बेकायदेशीर वसूल केलेली रक्कम त्यांना परत करावी अशी मागणी केली. अखेर याबाबत शेतकऱ्यांच्या बाजूने तडजोड होऊन हा प्रश्न सुटला. गांधीजींना चंपारण्य सोडून जाण्याचा हुकूम शासनाने बजावला होता; परंतु गांधीजींनी तो आदेश अमान्य केला व ते चंपारण्यामध्येच थांबले.

**अहमदाबादच्या गिरणी कामगारांचे नेतृत्व**

चंपारण्यानंतर गांधीजी अहमदाबादच्या कापड गिरणी कामगारांच्या प्रश्नाकडे वळले. तेथील कामगारांना मिळणाऱ्या वेतनाच्या प्रश्नावरून मालक व कामगार यांच्यात तणाव निर्माण झाला होता. कामगारांची बाजू न्याय्य आहे असे चौकशी केल्यानंतर गांधीजींना आढळून आले. त्यांनी कामगारांच्या वेतनाच्या प्रश्नावरून कामगारांना संपावर जाण्याचा सल्ला दिला. कामगार संपावर गेले. काही दिवसांनंतर संप बारगळणार अशी चिन्हे दिसू लागली. गांधीजींनी स्वत: कामगारांच्या बाजूने उपोषणाला बसण्याचे ठरविले; त्यामुळे कामगारांमध्ये पुन्हा चैतन्य निर्माण झाले. गिरणी मालकांवर दबाव आला आणि त्यांनी हा प्रश्न लवादाकडे सोपविण्याची तयारी दाखवली. लवादाने कामगारांची वेतनवाढीची मागणी मंजूर केली.

**खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा लढा**

तिसरा लढा पुन्हा १९१८ मध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल गांधीजींनी दिला. गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील पिके पावसाअभावी वाळून गेली होती; म्हणून शेतकऱ्यांनी शेतसाऱ्यात सूट मिळावी अशी मागणी केली. गांधीजींनी स्वत: त्या भागात पाहणी करून तेथील शेतकऱ्यांची मागणी वाजवी असल्याची खात्री करून घेतली होती. सरकारी नियमांप्रमाणेच एकचतुर्थांश पिके आल्यामुळे शेतकऱ्यांना महसुलातून सूट देणे आवश्यक होते. ब्रिटिश शासनाकडे शेतकऱ्यांनी यासंबंधी अर्ज व विनंत्या केल्या; परंतु त्याकडे शासनाने दुर्लक्ष केले. गांधीजींनी यावर शेतकऱ्यांना सरकारला महसूल न देण्याचा सल्ला दिला. गांधीजींचा विचार असा होता की, रयतेच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून शासन राज्य करू शकत नाही. सरकारच्या दडपशाहीला न घाबरता शेतकऱ्यांनी महसूल-बंदीची चळवळ चालविली. गांधीजींना या कामी वल्लभभाई पटेल यांनी सहकार्य केले. शेतकरी दुष्काळ, प्लेग इत्यादी संकटांनी ग्रासून गेला होता. शासनाने शेवटी याबाबत तडजोडीचे धोरण स्वीकारले आणि जे सारा देऊ शकतात त्यांच्याकडूनच तो स्वीकारण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय गांधीजींना कळताच त्यांनी शेतकऱ्यांची साराबंदीची चळवळ मागे घेतली. हा शेतकऱ्यांचा एक प्रकारे विजय होता.

चंपारण्य, अहमदाबाद व खेडा या तिन्ही ठिकाणांच्या लढ्यांतून भारतीय समाजाची संघर्ष करण्याची शक्ती, सामर्थ्य व मर्यादा गांधीजींच्या लक्षात आली आणि ते ज्या पद्धतीने जन-आंदोलने करू इच्छित होते त्याचीही चाचणी त्यांना घेता आली. त्याचबरोबर अशा छोट्या-छोट्या लढ्यांतून राष्ट्रीय चळवळ अधिक प्रबळ होत गेली. हे तिन्ही लढे गांधीजींनी १९१७-१९१९ या काळात दिले होते.

## गांधीजींच्या राजकीय लढ्याचे तंत्र व मार्ग

दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर गांधीजींनी राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्यापूर्वी शेतकरी व कामगारांच्या लढ्याचे नेतृत्व केले आणि त्यानंतरच्या चळवळीत काही राजकीय लढ्याची तंत्रे विकसित केली. त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान आणि तंत्र पुढीलप्रमाणे होते–

(१) **अहिंसा** : अहिंसा व सत्य ही दोन मूल्ये गांधीजींच्या संपूर्ण राजकारणाचा आधार होती. भारतीय संस्कृतीला अहिंसा हे तत्त्व नवीन नाही; परंतु राष्ट्रीय चळवळीत त्या मार्गाचा उपयोग गांधीजींनी सामान्य माणसाला शिकविला. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी आपल्या आत्मबलाचा उपयोग करणे ही अहिंसा होय. सामर्थ्य नाही म्हणून अहिंसेचा वापर हे त्यांना मान्य नव्हते, तर सामर्थ्य असतानाही बळाचा वापर करायचा नाही, हा संयम त्यांना अपेक्षित होता. हिंसेने हिंसा संपत नाही, अहिंसेचे पालन करून विजय मिळविला पाहिजे असे गांधीजींचे मत होते. गांधीजींना अभिप्रेत अहिंसा सबलांची होती, दुर्बलांची नव्हे. आपल्या कार्यकर्त्यांमध्ये अहिंसेच्या पालनाद्वारे निर्भयता गांधीजींनी निर्माण केली. शस्त्रापेक्षाही हिंसेचा वापर न करण्याचा निर्धार हेच व्यक्तीचे खरे सामर्थ्य असले पाहिजे, असे त्यांचे मत होते. अहिंसेच्या उपासकाने साधी राहणी, कुठल्याही मोहाला बळी न पडण्याची तयारी, निर्भयता, शत्रूबद्दल द्वेषाऐवजी सद्भावना आणि सत्याबद्दल आग्रही वृत्ती हे आपल्या व्यक्तिमत्त्वात आणले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती.

(२) **सत्याग्रह** : वर उल्लेखिल्याप्रमाणे गांधीजींनी सत्यावर आधारलेल्या सत्याग्रहाचा आरंभ आपल्या चळवळीत केला. सत्याचा व न्यायाचा आग्रह म्हणजेच सत्याग्रह आणि तो आग्रह धरणारा तो सत्याग्रही होय. अन्याय, असत्य, अत्याचार यांच्या विरोधात लढा देण्यासाठी सत्याग्रहीने काही मूल्ये आपल्या व्यक्तिमत्त्वात रुजविणे आवश्यक होते. सत्याग्रहाचा आधार हा आत्मबल आहे. हिंसेचा वापर न करता अहिंसेच्या व आत्मबलाच्या आधारावर सत्याग्रही आपल्यावरील अन्याय थोपवू शकतो, असा गांधीजींचा विश्वास होता. सत्याग्रही आपल्यावर अन्याय करणाऱ्यांविरुद्ध द्वेष किंवा दुष्टपणा बाळगत नाही किंवा हिंसेचा वापरही करीत नाही, उलट विरोधकांबद्दल त्याच्या मनात सद्भावना व प्रेमच असते. विरोधकांनी केलेले आघात व दिलेली शिक्षा तो शांतपणे सहन करतो, त्याला प्रत्युत्तर देत नाही. या आत्मक्लेशातून सत्याग्रही विरोधकांचे हृदयपरिवर्तन घडवून आणतो आणि त्याला सत्याची जाणीव करून देतो. आपल्यावर होणाऱ्या आघाताच्या वेदना सहन करून सत्याग्रही विरोधकांच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करतो. यासाठी सत्याग्रहीमध्ये धैर्य, सहनशक्ती आणि आपल्या विचारांवर अढळ निष्ठा असणे आवश्यक आहे. मात्र सत्याग्रहीला कोणताही मोह, स्वार्थ असू नये हे अपेक्षित आहे. याचाच अर्थ साधने जशी उच्च नीतिमूल्यांवर आधारलेली हवी तसेच साध्य किंवा ध्येय उच्च हवे. सत्याग्रहीजवळ शिस्त, नम्रता, साधेपणा, विवेक, संयम आणि मनोधैर्य असणे आवश्यक होते.

सत्याग्रहामध्ये काही वेळा गांधीजींनी उपोषणाचा अवलंब करून योग्य तो सामाजिक व राजकीय बदल घडवून आणला; परंतु सत्याग्रहाच्या सर्व अटी उपोषणालाही लागू होत्या. थोडक्यात, 'असत्य व अन्याय यांचा शांततेने व अहिंसक मार्गाने प्रतिकार करायचा. हा प्रतिकार अन्याय करणाऱ्या व्यक्तीचा नव्हे तर अन्यायी प्रवृत्तीचा आहे, ही जाणीव ठेवायची. प्रतिकार करताना कोणत्याही प्रकारे हिंसा करायची नाही. विरोधकांविरुद्ध शस्त्र न वापरता विरोधकांचे मतपरिवर्तन घडवून आणायचे आणि आपली बाजू सत्य व न्याय्य आहे हे विरोधकांना पटवून द्यावयाचे आणि सत्याचा विजय होईपर्यंत माघार घ्यावयाची नाही' हा गांधीजींना अपेक्षित असलेल्या सत्याग्रहाचा तात्त्विक आधार होता.

(३) **असहकार** : असहकार हे राष्ट्रीय चळवळीकरिता गांधीजींनी वापरलेले नवे तंत्र होते. शासनाला जनतेकडून दिला जाणारा सक्तीचा सहकार गांधीजींना मान्य नव्हता. सहकार बरोबरीच्या नात्यातून आणि

स्वयंस्फूर्तीने करणे हे त्यांना अपेक्षित होते. एखाद्या व्यक्तीने तुरुंगवास भोगण्यापेक्षा सामान्य जनतेने प्रचंड संख्येने सरकारविरुद्ध उभे राहून आपला विरोध व्यक्त करून, सामूहिक शक्तीचा आविष्कार जन-आंदोलनाद्वारे करणे गांधीजींना हवे होते. टिळक युगात व गांधीजींच्या कालखंडात हा फरक पडला होता. आपापल्या क्षेत्रात समाजघटकांनी शासनाशी असहकार पुकारल्यास शासनाला त्याची दखल घेणे भाग पडेल असे त्यांचे मत होते. परकीय सत्तेविरुद्ध लढण्यासाठी भारतीयांना आपल्या हाती असलेल्या शक्तीचा प्रत्यय या चळवळीतून गांधीजींनी आणून दिला; कारण अशा आत्मविश्वासपूर्ण स्वाभिमानी, निर्भय आणि जागृत झालेल्या जनतेला चिरडून टाकणे कोणत्याही शक्तीला एवढे सोपे नव्हते आणि अशी जागृत जनता कोणत्याही पराकोटीच्या त्यागाला तयार असते. गांधीजींनी प्रत्येक आंदोलकाला परिपूर्ण सत्याग्रही कसे व्हावे याचा मार्ग दाखविला होता. थोडक्यात, नि:शस्त्र जनतेने शासनाशी सहकार्य करावयाचे नाकारल्यास आणि संघटित होऊन शासनाविरुद्ध उभे राहिल्यास कोणतेही शासन चालणार नाही असा त्यांचा विश्वास होता. त्याला कारण असे की, कोणत्याही शासनाचा आधार जनतेचे सहकार्य हाच असू शकतो.

(४) **सविनय कायदेभंग** : असहकारानंतर पुढचे पाऊल गांधीजींनी सविनय कायदेभंगाचे उचलले. एक-दोन व्यक्तींनी कायदा न मोडता त्या कायद्याचा भंग सर्व जनतेने केल्यास त्यातून त्या कायद्याबद्दल असलेला जनतेचा विरोध व्यक्त होऊ शकतो. परकीय सत्तेला आपल्यावर राज्य करण्याचा कुठलाही अधिकार नाही व असे नैतिक अधिष्ठान नसलेल्या सत्तेचे अन्यायी कायदे पालन करावयाचे नाहीत आणि असे करून त्या शासनाला आपली मान्यता नाही हे स्पष्ट करावयाचे, ही सविनय कायदेभंगातील भूमिका होती. मात्र इथेही सविनय कायदेभंगाला अहिंसा व सत्याग्रह यांचा आधार आहे. कायदा मोडल्याबद्दलची शिक्षा स्वीकारण्याची तयारी ठेवावी; तसेच विरोधकाला हिंसेने उत्तर द्यावयाचे नाही किंवा प्रतिकार करायचा नाही. कायदेभंगाची होणारी शिक्षा सोसून सत्याग्रही शासनाच्या दडपशाहीला जगासमोर मांडतो व इतरांनाही तसा लढा देण्यास उद्युक्त करतो. सविनय कायदेभंगाच्या सत्याग्रहीला स्वार्थ आणि मोह नसावा; तो चारित्र्यसंपन्न असावा आणि त्याची संयम आणि अंगीकृत कार्यावर श्रद्धा असावी आणि विरोधी पक्षाबद्दल सद्भावना असावी हे अपेक्षित होते. आत्मबलाच्या आधारेच इथेही सविनय कायदेभंग करणारा सत्याग्रही आपल्या न्याय्य व सत्यासाठी चाललेल्या लढ्यात विजय प्राप्त करतो.

(५) **बहिष्कार** : टिळकांनी सांगितलेल्या चतु:सूत्रीपैकी बहिष्कार हा एक मार्ग होता. याचा विस्तार आणि वापर गांधीजींनी आपल्या चळवळीत केला. विशेषत: आपल्या असहकाराच्या चळवळीत गांधीजींनी परकीय शासनाची कायदेमंडळे, न्यायालये, शिक्षणसंस्था, शासकीय सेवा, विदेशी वस्तू इत्यादींवर बहिष्कार घालण्याचे आवाहन भारतीय जनतेला केले. संपूर्णपणे आत्मनिर्भर व स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने बहिष्कार हे पहिले पाऊल होते. बहिष्कारातून परकीय सत्तेबद्दलचा निषेध आणि भारतीयांना स्वावलंबन, अस्मिता व स्वयंपूर्णता मिळवून देण्याचा प्रयत्न गांधाजींनी केला. कायदेमंडळे किंवा शाळा भारतीयांना नको होती असे नाही; परंतु शासननियंत्रित शाळा किंवा कायदेमंडळातून राष्ट्रीय चळवळीला पोषक व स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झगडणाऱ्या राष्ट्राला उपयुक्त वातावरण मिळणार नव्हते. थोडक्यात, बहिष्कार हे परकीय सत्तेच्या जोखडाखालून मुक्त करून घेण्यासाठी आणि स्वसामर्थ्याचा प्रत्यय आणून देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल होते. या सर्व साधनांच्या द्वारा स्वसामर्थ्य आणि स्वत्वाची जाणीव भारतीय जनतेला त्यांनी करून दिली; नि:शस्त्र जनतेला राजकीय जागृती मिळवून दिली आणि त्या आधारे स्वातंत्र्याकडे वाटचाल केली.

**१९१९ मधील भारतामधील राजकीय परिस्थिती**

इ. स. १९१८ च्या मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांमध्ये भरीव राजकीय अधिकार भारतीयांना देण्यात आले नाहीत; त्यामुळे भारतीयांची निराशा झाली; कारण टिळकांच्या होमरूल चळवळीने भारतीयांच्या स्वराज्याबाबत

अपेक्षा उंचावल्या होत्या; तसेच या सुमारास दुष्काळ पडून जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढले होते. बंगाल व पंजाब या प्रांतांत ब्रिटिशांचे अत्याचार टोकाला गेले होते. तिथे सैन्यभरती आणि धान्यवसुलीसाठी शासनाने लोकांवर सक्ती केली होती. तुर्कस्तानच्या सुलतानाला म्हणजेच खलिफाला इंग्लंडने चांगली वागणूक दिली नव्हती; यामुळे भारतातील मुस्लीम ब्रिटिश शासनावर नाराज होते. यातूनच पुढे खिलाफत चळवळ निर्माण झाली. भारतीय सैनिकांनी युद्धकाळात युरोपातील जनतेला असलेले अधिकार व त्यांचे स्वातंत्र्य पाहिले होते आणि या तुलनेत ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून भरडल्या जाणाऱ्या भारतीयांची स्थिती उलट होती.

### रौलेट विधेयकाविरुद्ध आंदोलन

ब्रिटिश शासनाने भारतातील शासनविरोधी कारवाया दडपून टाकण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी एक समिती रौलेट यांच्या अध्यक्षतेखाली नेमली होती. या समितीने आपला अहवाल १९१८ मध्ये शासनाला सादर केला. या अहवालाच्या आधारे केंद्रीय शासनाने मार्च, १९१९ मध्ये केंद्रीय विधिमंडळात रौलेट कायदा पास केला. या कायद्यानुसार शासनविरोधी कारवाया करणाऱ्यांवर खटला चालविण्यासाठी खास न्यायालयाची तरतूद करण्यात आली. या न्यायालयात ज्युरी असणार नव्हते. संशयित आरोपीला कोणतेही कारण न दाखविता, खटला न भरता, कितीही दिवसांसाठी तुरुंगात डांबण्याचा अधिकार या कायद्यान्वये शासनाला मिळाला होता. हा खटला बंदिस्त न्यायालयात चालविला जाणार होता; त्यामुळे जनतेला खटल्याबाबत कोणतीही माहिती मिळणे शक्य नव्हते. असा हा अन्यायकारक कायदा होता. या कायद्यातील जाचक आणि अन्यायकारक तरतुदींमुळे याचा उल्लेख 'काळा कायदा' म्हणून केला गेला.

गांधीजींनी रौलेट विधेयकाला कायद्याचे स्वरूप येण्यापूर्वीच गव्हर्नर जनरलला पत्र लिहून हा कायदा पास झाल्यास आपण त्याला विरोध करू असे स्पष्ट केले होते. त्यानुसार रौलेट कायदा संमत झाल्यानंतर गांधीजींनी त्याच्याविरुद्ध अहिंसक मार्गाने सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. या कायद्याविरुद्ध गांधीजींनी ३० मार्च, १९१९ या दिवशी आपापले व्यवहार बंद ठेवून हरताळ पाळण्याचे आवाहन भारतीय जनतेला केले; परंतु हे आवाहन सर्व देशभर वेळेवर पोहोचले नाही हे लक्षात आल्यावर हरताळासाठी ६ एप्रिल हा दिवस ठरविण्यात आला. मात्र दिल्लीला ३० मार्चला सत्याग्रह झाला. काही ठिकाणी रौलेट कायद्याविरुद्ध जनतेने काढलेल्या मिरवणुकीवर गोळीबार करण्यात आला. याच वेळी गांधीजी दिल्ली व अमृतसर येथील नेत्यांच्या विनंतीवरून तिकडे जात असताना त्यांना मध्ये गाडीतून सक्तीने उतरविण्यात येऊन मुंबईला पाठविण्यात आले. याची तीव्र प्रतिक्रिया जनतेतून उमटली. अहमदाबादेत मिल कामगारांनी सार्वजनिक संपत्तीची नासधूस केली. जमावाला आवरण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला. मुंबईतील लोकांनीही आपला निषेध नोंदविला. आपण आयोजित केलेल्या सत्याग्रहाला हिंसक वळण मिळत असल्यामुळे गांधीजींनी आपले सत्याग्रहाचे आवाहन मागे घेतले. यासाठी प्रायश्चित्त म्हणून त्यांनी उपोषण केले. यापुढे सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी तो अहिंसक राहील या हेतूने जनतेची मानसिक तयारी करण्याकडे लक्ष पुरविण्याचे त्यांनी ठरविले. देशभर झालेल्या हरताळातून रौलेट कायद्याबद्दलचा निषेध जनतेने व्यक्त केला.

### जालियनवाला बाग हत्याकांड

पंजाबात शासनाविरुद्ध असंतोष होता. पहिल्या महायुद्धात सैन्यभरतीसाठी तरुणांवर सक्ती करण्यात आली होती; तसेच युद्धखर्चासाठी निधी गोळा करण्याच्या हेतूने व सैन्यासाठी धान्य गोळा करण्यासाठी पंजाबचा लेफ्टनंट गव्हर्नर जनरल मायकेल ओडवायर याने पंजाबी जनतेवर दडपशाही केली होती. भारतीय क्रांतिकारकांनी पंजाबात गदरचा उठाव घडवून आणण्याचे प्रयत्न केले होते; त्यामुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांनी क्रूरपणे अनेक तरुणांना संशयावरून अटक करून त्यांना तुरुंगात डांबले होते. वृत्तपत्रांवर अनेक बंधने घालण्यात आली होती. पंजाबातील जनतेमध्ये शासनाविरुद्ध असलेल्या असंतोषाचा उद्रेक रौलेट कायद्याविरुद्धच्या सत्याग्रहात झाला. गांधीजींच्या

आवाहनानुसार ६ एप्रिल रोजी पंजाबातील लाहोर, अमृतसर, गुजरानवाला, कुसूर इत्यादी ठिकाणी हरताळ पार पडला; परंतु गांधीजींना शासनाने पंजाबात न येऊ दिल्याबद्दल जनतेने निषेध व्यक्त केला. ९ एप्रिल रोजी अमृतसर येथील डॉ. सैफुद्दिन किचलू व डॉ. सतपाल या लोकप्रिय नेत्यांना शासनाने शहरातून सक्तीने अज्ञातस्थळी हलविले. या नेत्यांच्या सुटकेसाठी अमृतसरमधील जनतेने शासकीय अधिकाऱ्यांच्या कचेरीवर मोर्चा काढला. या मोर्चावर गोळीबार केल्यामुळे जमाव प्रक्षुब्ध झाला. जमावाने शासकीय इमारतींना आगी लावल्या. या वेळी शेरवूड या मिशनरी महिला डॉक्टरवर जमावाने हल्ला केला; परंतु तिला काही भारतीयांनीच वाचविले.

या सुमारास अमृतसर शहराचा ताबा जनरल डायर याच्याकडे सोपविण्यात आला. त्याने सभा, मिरवणुका इत्यादींवर बंदी घातली; परंतु याची पुरेशी सूचना व माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात आली नाही. सूचना जनतेपर्यंत न पोहोचल्यामुळे आपल्या नेत्यांच्या हद्दपारीच्या निषेधार्थ १३ एप्रिल रोजी अमृतसरमधील जनतेने एक निषेध सभा जालियनवाला बाग येथे घेण्याचे ठरविले आणि तशी घोषणा करण्यात आली. सभेला महिला, मुले, वृद्ध इत्यादी उपस्थित होते. सभा सुरू होण्यापूर्वी लोकांना त्यापासून परावृत्त करण्याऐवजी जनरल डायरने सभा सुरू असताना बागेला चोहोबाजूंनी सैन्यासह घेरले. बागेच्या चोहोबाजूंनी उंच भिंती होत्या व जाण्या-येण्यासाठी एकच अरुंद मार्ग होता. त्यासमोर चिलखती गाड्या मशीनगनसह उभ्या करण्यात आल्या आणि कुठलीही पूर्वसूचना न देता डायरने आपल्या सैनिकांना सभेला जमलेल्या नि:शस्त्र, निरपराध जनतेवर गोळीबार करण्याचा हुकूम दिला. बाहेर पडण्याचा एकच मार्ग व तोही अडविलेला, अशा स्थितीत लोकांना जीव वाचविण्यासाठी पळता येणेही शक्य नव्हते. शेकडो लोकांचा बळी घेऊन डायर तेथून निघून गेला; मृतांना व जखमी लोकांना तेथेच ठेवून. शासनाने जखमींना कुठल्याही प्रकारची वैद्यकीय मदत केली नाही किंवा मृतांना उचलण्याची व्यवस्था केली नाही. इतकेच नव्हे तर त्याच दिवशी संध्याकाळी शहरात संचारबंदी लागू केली; त्यामुळे अनेकांना या गोळीबारात बळी पडलेल्या आपल्या नातेवाईकांना शोधणे किंवा जखमींवर इलाज करणे अशक्य झाले. शासनाने याच वेळी अनेकांना अटक करून तुरुंगात डांबले. डॉ. शेरवूड या महिलेला ज्या रस्त्यावर लोकांनी मारहाण केली होती त्या रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्यांना पालथे पाडून सरपटत जाण्याची सक्ती केली. १५ एप्रिलपासून पंजाबात लष्करी कायदा म्हणजेच मार्शल लॉ लागू करण्यात आला. वृत्तपत्रांना पंजाबबाहेर वृत्तपत्रे पाठविण्यास मनाई करण्यात आली. जालियनवाला बाग हत्याकांड हा ब्रिटिश अत्याचाराचा दाहक अनुभव होता. याविरुद्ध भारतीय जनतेने आपला संताप व्यक्त केला होता.

जालियनवाला बाग प्रकरणाची चौकशी करण्यासाठी काँग्रेसने एक चौकशी समिती नेमून या हत्याकांडाला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना शिक्षा करण्याची मागणी केली. शासनाने या प्रकरणी चौकशी करण्यासाठी लॉर्ड हंटर याच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली. या समितीसमोर जनरल डायरने आपल्या जबानीत पंजाबच्या जनतेला धडा शिकविण्यासाठी आपण गोळीबार केला आणि दारूगोळा संपल्यामुळे गोळीबार थांबवला, अन्यथा आणखी गोळीबार केला असता असे सांगितले. त्याच्या उद्दामपणाच्या उत्तरामुळे भारतीयांना ब्रिटिश नोकरशाहीच्या राक्षसी वृत्तीचा परिचय जवळून आला. ब्रिटिश समाजातील मोठ्या वर्गाने व भारतातील इंग्रजांनी जनरल डायरला पाठिंबा व्यक्त केला. हंटर चौकशी समितीच्या अहवालानंतर जनरल डायरला फक्त सेवामुक्त करण्यात आले आणि त्याने केलेला गोळीबार योग्य होता, मात्र त्याची पूर्वसूचना त्याने जमावाला द्यायला हवी होती असे मत समितीने व्यक्त केले. यावरून भारतीय जनतेबद्दल ब्रिटिशांचा तुच्छतेचा आणि उपेक्षेचा दृष्टिकोन स्पष्ट झाला.

### खिलाफतीचा प्रश्न

ऑटोमन साम्राज्याचा प्रमुख, तुर्कस्तानचा सुलतान हा परंपरेने सर्व मुसलमानांचा धर्मप्रमुख होता. त्यालाच खलिफा असे म्हटले जाई. पहिल्या महायुद्धात तुर्कस्तान हा जर्मनीच्या बाजूने म्हणजे इंग्लंडच्याविरुद्ध युद्धात उतरला

होता. युद्धात इंग्लंडचा विजय होऊन जर्मनी पराभूत झाला. युद्धकाळात इंग्लंडला भारतीय मुस्लिमांचे सहकार्य सैनिक म्हणून लढण्यासाठी हवे होते. या हेतूने इंग्लंडने भारतीय मुस्लिमांना तुर्कस्तानच्या सुलतानाबाबत असे आश्वासन दिले की, अरेबिया व मेसोपोटेमिया येथील इस्लामच्या पवित्र स्थळांना धक्का लागू देणार नाही व तुर्कस्तानचे स्वातंत्र्य व अखंडता टिकवली जाईल; परंतु युद्धानंतर सेव्हर्सचा कडक तह तुर्कस्तानवर ब्रिटिशांनी लादला. या तहाने तुर्कस्तानचे विघटन झाले. अरब प्रदेश तुर्कस्तानच्या ताब्यात राहिला नाही. तुर्कस्तानच्या सुलतानाची सत्ता ही नामधारी उरली. तुर्कस्तानच्या सुलतानाच्या सत्तेवर आणि प्रतिष्ठेवर हा मोठा आघात होता. भारतीय मुस्लिमांना ब्रिटिशांच्या या कृतीतून आपला विश्वासघात झाल्याची भावना जाणवली. म्हणून ब्रिटिशांचा निषेध करणे त्यांना आवश्यक वाटले.

यातूनच भारतीय मुस्लिमांनी तुर्कस्तानच्या खलिफाच्या बचावासाठी खिलाफत चळवळ सुरू केली. नोव्हेंबर, १९१९ मध्ये अखिल भारतीय खिलाफत कमिटीची स्थापना करण्यात आली आणि याचे अध्यक्षपद गांधीजींना देण्यात आले. गांधीजींनी भारतीय मुस्लिमांना आवाहन केले की, जर खलिफाच्या पुनर्स्थापनेसंबंधात इंग्लंडला योग्य ते पाऊल उचलणे भाग पाडावयाचे असेल तर असहकार व बहिष्कार या मार्गांचा अवलंब करावा लागेल; तसेच गांधीजींनी खिलाफतीच्या प्रश्नावर हिंदूंनी भारतातील मुस्लिमांना पाठिंबा द्यावा असे आवाहन केले. यातून हिंदु-मुस्लीम ऐक्य घडून येईल अशी त्यांची अपेक्षा होती. याच सुमारास गांधीजींनी काँग्रेसच्या वतीने असहकाराची चळवळ सुरू करण्याचे ठरविले. जून, १९२० मध्ये खिलाफत कमिटीने अलाहाबाद येथे झालेल्या आपल्या बैठकीत गांधीजींनी ब्रिटिश शासनाविरुद्ध सुचविलेला अहिंसक असहकार आंदोलनाचा मार्ग, खिलाफत प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी स्वीकारला आणि गांधीजींना खिलाफत चळवळीचे नेतृत्व करण्याची विनंती केली. जुलै, १९२१ मध्ये कराची येथे भरलेल्या खिलाफत परिषदेने भारतीय मुस्लिमांसमोर खिलाफत चळवळीसंबंधात कार्यक्रम ठेवला. यात तुर्कस्तानच्या सार्वभौमत्वावर बंधने पडतील अशा कोणत्याही अटींना मान्यता न देणे, इस्लामच्या पवित्र स्थळांवर मुस्लिमेतरांचे नियंत्रण अमान्य करणे, ब्रिटिश लष्करात मुस्लिमांनी नोकरी करणे हे धर्मदृष्ट्या बेकायदेशीर असल्याचे घोषित करणे इत्यादी निर्णयांचा समावेश होता. अशा रीतीने काँग्रेस पक्षाची असहकार चळवळ व खिलाफत चळवळ एकत्र जोडली गेली. भारतीय मुस्लिमांनी या चळवळीत भाग घेतला. भारतीय मुस्लिमांची आणि हिंदु-मुस्लीम ऐक्यनिर्मिती साधण्याची संधी खिलाफत चळवळीतून मिळत आहे असे गांधीजींचे मत होते.

### काँग्रेसचे कोलकाता अधिवेशन (सप्टेंबर, १९२०)

गांधीजींनी जी असहकाराची चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला होता त्याची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे होती. १९१९ च्या कायद्यातील सुधारणांबाबत भारतीयांचे असमाधान, जालियानवाला बाग हत्याकांड, हंटर कमिशनचा रिपोर्ट, पंजाबमधील ब्रिटिश शासनाची दडपशाही इत्यादींमुळे प्रक्षुब्ध झालेल्या भारतीयांच्या भावनांना वाचा फोडण्यासाठी असहकाराची चळवळ सुरू करण्याचे गांधीजींनी ठरविले. मान्यतेसाठी चळवळीचा कार्यक्रम गांधीजींनी कोलकाता (तत्कालीन कलकत्ता) येथे सप्टेंबर, १९२० मध्ये भरलेल्या काँग्रेसच्या खास अधिवेशनात मांडला. खिलाफत संघटनेने सुरू केलेल्या आंदोलनाबरोबर काँग्रेसने असहकार आंदोलन सुरू करावे असा ठराव गांधीजींनी मांडला, तो संमत झाला. मात्र या ठरावाला बिपिनचंद्र पाल, चित्तरंजन दास, ॲनी बेझंट, पं. मदन मोहन मालवीय, बॅ. जीना आदी नेत्यांनी विरोध केला. लोकमान्य टिळकांचे निधन या अधिवेशनापूर्वीच झाले होते आणि आता त्यांच्यानंतर काँग्रेसचे नेतृत्व गांधीजींकडे आले होते.

### काँग्रेसचे नागपूर अधिवेशन (डिसेंबर, १९२०)

काँग्रेसच्या कोलकाता येथील खास अधिवेशनात जरी असहकाराचा ठराव पास झाला असला तरीही नियमित वार्षिक अधिवेशनात त्याला मंजुरी मिळविणे आवश्यक होते. या हेतूने नागपूर अधिवेशनात गांधीजींचा असहकाराचा

ठराव मांडला गेला. यावेळी चित्तरंजन दास, लाला लजपतराय यांनी ठरावाला पाठिंबा दिला असला तरीही बॅ. जीना, पं. मालवीय, ॲनी बेझंट, बिपिनचंद्र, टिळकांचे अनुयायी खापर्डे, अणे, डॉ. मुंजे यांनी असहकार ठरावाला विरोध केला. मात्र या अधिवेशनात असहकाराचा ठराव संमत झाला.

**असहकार चळवळ : भूमिका व कार्यक्रम**

असहकाराच्या मागे गांधीजींची भूमिका अशी होती की, भारतातील ब्रिटिश सत्ता ही केवळ शस्त्रसामर्थ्याच्या बळावर टिकली आहे असे नव्हे, तर भारतातील लोकांनी ब्रिटिश सत्तेला दिलेल्या सहकार्यामुळे ती टिकून राहिली आहे. लोकांचे सहकार्य हाच कोणत्याही शासनव्यवस्थेचा मुख्य आधार असतो; म्हणून अनैतिक ब्रिटिश सत्तेला भारतीयांकडून मिळत असलेले सहकार्य जनतेने काढून घेतल्यास ब्रिटिशांना आपले राज्य इथे टिकविता येणार नाही. या हेतूनेच असहकाराची चळवळ त्यांनी सुरू करण्याचे ठरविले. याच वेळी गांधीजींनी 'एका वर्षात स्वराज्य' अशीही घोषणा दिली.

असहकाराच्या कार्यक्रमाचे दोन भाग होते. विरोधात्मक कार्यक्रमात पुढील मुद्द्यांचा समावेश होता–

(१) शासकीय न्यायालयांवर बहिष्कार.

(२) शासकीय आणि शासकीय अनुदानावर चालणाऱ्या शिक्षणसंस्था, शाळा आणि महाविद्यालयांवर बहिष्कार.

(३) कायदेमंडळावर बहिष्कार आणि त्यासाठी होणाऱ्या निवडणुकांवर बहिष्कार.

(४) शासनाने दिलेले मान, सन्मान, पदव्या, उपाधी इत्यादींचा त्याग करणे आणि शासकीय समारंभांवर बहिष्कार घालणे.

(५) शासकीय नोकऱ्यांचा त्याग करणे.

(६) ब्रिटिश मालावर विशेषत: कापडावर बहिष्कार घालणे.

(७) कर देण्यास विशेषत: शेतसारा देण्यास नकार देणे.

असहकार चळवळीच्या विधायक कार्यक्रमात खालील मुद्द्यांचा समावेश होता–

(१) शासकीय न्यायालयाबाहेर न्याय पंचायत स्थापन करून लवादाद्वारे तंटे सोडविणे.

(२) शासकीय किंवा शासन नियंत्रित शाळांऐवजी राष्ट्रीय शिक्षणसंस्थांची स्थापना करून मुलांना त्यात प्रवेश देणे.

(३) स्वदेशी चळवळीला पाठिंबा देणे. विशेषत: खादी व हातमागाच्या कापडाला उत्तेजन देणे.

(४) मद्यपानाला विरोध करून दारूबंदी यशस्वी करणे.

(५) अस्पृश्यता दूर करणे.

(६) हिंदु-मुस्लीम ऐक्य साधणे.

(७) टिळकांच्या स्मरणार्थ स्वराज्य फंडात एक कोटी रुपये गोळा करणे.

## असहकार चळवळीची वाटचाल

गांधीजींनी असहकाराच्या चळवळीच्या प्रचारासाठी देशभर दौरा केला. चळवळीच्या सर्वच कार्यक्रमांबाबत जनतेचा प्रतिसाद चांगला होता. लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ १ कोटी रुपयांचा स्वराज्य फंड उभारण्याचा संकल्प १ वर्षाच्या आत पूर्ण झाला. विदेशी मालाच्या विरुद्ध, विशेषत: कापडाच्या विरुद्ध आंदोलन प्रभावी ठरले. विदेशी कापडाच्या दुकानांसमोर निदर्शने करण्यात आली. विदेशी कापडावर बहिष्कार घातला गेला आणि त्याच्या होळ्या पेटविण्यात आल्या. बहिष्कारामुळे भारतात आयात केल्या जाणाऱ्या परदेशी कापडात घट झाली. इ. स. १९२०-२१ या वर्षात १०२ कोटी रुपयांचे कापड आयात केले गेले, तर १९२१-२२ या काळात

ही आयात ५७ कोटी रुपयांपर्यंत घसरली. दारूविरुद्धच्या आंदोलनामुळे सरकारच्या उत्पन्नात घट झाली. नोव्हेंबर, १९२१ मध्ये इंग्लंडचे युवराज प्रिन्स ऑफ वेल्सचे आगमन भारतात झाले. ते ज्या शहरामध्ये गेले तिथे जनतेने हरताळ पाळला. बंगाल व आंध्रच्या काही भागांत शेतकऱ्यांनी करबंदीची चळवळ चालवून सरकारला कर देण्यास नकार दिला.

चित्तरंजन दास, पं. मोतीलाल नेहरू यांसारख्या अनेक नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी आपला वकिलीचा व्यवसाय सोडून दिला. न्यायालयावरच्या बहिष्कारातून गांधीजींना हे दाखवायचे होते की, ब्रिटिशांच्या कायद्यांना व न्यायालयांना भारतीय जनता महत्त्व देत नाही. शैक्षणिक संस्थांवरील बहिष्काराला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. या बहिष्कारामागे हेतू असा होता की, शासनाच्या ताब्यातील शाळांमधून राष्ट्रीयत्वाचे व प्रखर राष्ट्रवादाचे संस्कार केले जाणार नाहीत. उलट परकीयांच्या गुलामगिरीची शिकवण मिळते; म्हणूनच राष्ट्रीय शाळांची स्थापना केली जावी, जिथे राष्ट्रीयत्वाचे संस्कार घेतलेले विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडतील व राष्ट्रीय चळवळीला पुढे नेतील. या उद्देशाने देशाच्या अनेक भागांत राष्ट्रीय शिक्षणसंस्थांची स्थापना करण्यात आली. विशेषत: महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांच्या नावाने अनेक विद्यालये सुरू करण्यात आली. कायदेमंडळावरील बहिष्कार काँग्रेसपुरता मर्यादित राहिला. इ. स. १९२१ च्या निवडणुकीत काँग्रेसबाहेरील काही सदस्य कायदेमंडळात निवडून आले तरी काँग्रेसच्या बहिष्कारामुळे कायदेमंडळांना खऱ्या अर्थाने प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त झाले नाही. अनेकांनी ब्रिटिश शासनाकडून मिळालेले मान, सन्मान परत केले. सरकारने दिलेल्या पदव्या धारण करणे ही प्रतिष्ठेची बाब उरली नाही आणि ब्रिटिशांकडून मिळणाऱ्या सन्मानाला जनतेत काही महत्त्व उरले नाही. काँग्रेसच्या अनेक नेत्यांना व कार्यकर्त्यांना शासनाने तुरुंगात टाकले होते. खिलाफत चळवळीच्या निमित्ताने असहकाराच्या चळवळीच्या काळात हिंदूंवर केलेल्या अत्याचारांमुळे हिंदु-मुस्लीम ऐक्य उरले नाही. जातीय दंगलीने हिंदु-मुस्लीम संबंध आणखीनच बिघडले. काँग्रेस व खिलाफत समिती या संस्था शासनाने बेकायदेशीर घोषित केल्या. डिसेंबर, १९२१ मध्ये अहमदाबाद येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात असहकार चळवळ सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. सरकारशी तडजोड करण्याचे प्रयत्न मवाळांनी केले; परंतु ते यशस्वी ठरले नाहीत.

**बार्डोलीच्या सत्याग्रहाचा निर्णय**

१ फेब्रुवारी, १९२२ रोजी गांधीजींनी गव्हर्नर जनरल लॉर्ड रीडिंग यांना पत्र लिहिले की, सरकारने सर्व सत्याग्रहींची मुक्तता करण्याचे आणि वृत्तपत्रांवरील व संघटनांवरील निर्बंध रद्द करण्याचे आश्वासन ७ दिवसांच्या आत दिल्यास आपण लढाऊ स्वरूपाचा सविनय कायदेभंग सत्याग्रह करणार नाही; परंतु ब्रिटिश शासन यावेळी काँग्रेसची असहकार चळवळ चिरडून टाकण्याच्या विचारात असल्यामुळे शासन व काँग्रेस यांच्यात तडजोड होऊ शकली नाही. यापुढे गांधीजींनी व्यापक जन-आंदोलनाची सुरुवात करताना हेच तंत्र वापरले. राज्यकर्त्यांकडे जनतेवरील अन्याय दूर करण्यासंबंधी व हिताच्या दृष्टीने काही मागण्या करावयाच्या, सरकारला त्या मान्य करण्यासाठी अवधी द्यावयाचा व त्या अवधीत मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन सुरू करून त्या आंदोलनाची जबाबदारी सरकारवर टाकावयाची. इतकेच नव्हे तर आंदोलन मागे घेण्यासाठी ते तडजोडीला जागा ठेवीत; कारण जनता फार काळ आंदोलन चालवू शकत नाही व सर्वच मागण्या मान्य होतील असेही होत नसते; म्हणून आंदोलन कोलमडून पडण्यापूर्वीच जनतेचे नीतिधैर्य टिकवून महत्त्वाच्या मागण्या ते पदरात पाडून घेत आणि पुढच्या आंदोलनासाठी सज्ज होत.

शासनाला दिलेल्या निर्वाणीच्या खलित्याची मुदत संपल्यानंतर गुजरातमधील सुरत जिल्ह्यातील बार्डोली या गावी सत्याग्रह करण्याचा निर्णय गांधीजींनी घेतला; परंतु हा सत्याग्रह सुरू होण्यापूर्वीच चळवळीत झालेल्या हिंसाचारामुळे संपूर्ण असहकार चळवळ गांधीजींनी स्थगित केली.

### चौरीचौरा येथील हिंसाचार

उत्तर प्रदेशातील (संयुक्त प्रांत) गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा येथे ५ फेब्रुवारी, १९२२ रोजी काँग्रेस स्वयंसेवकांच्या शांततापूर्ण मिरवणुकीवर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात काही लोक ठार झाले; तेव्हा संतप्त जमावाने पोलिसांवर हल्ला केला. पोलिसांनी जवळचा दारुगोळा असेपर्यंत गोळीबार केला; परंतु तो संपल्यानंतर स्वत:ला वाचविण्यासाठी एका इमारतीत आश्रय घेतला. या इमारतीला लोकांनी आग लावली. त्यात २२ पोलीस जळून मृत्यू पावले. उत्तर प्रदेशात बरेली या ठिकाणी असाच हिंसाचार घडून आला. चळवळ हिंसक वळण घेत असल्यामुळे गांधीजींनी चळवळ मागे घेतली. चौरीचौरा येथील घटना कळताच गांधीजींनी बार्डोलीचा सत्याग्रह स्थगित केला आणि नंतर संपूर्ण असहकार चळवळ स्थगित करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयाला अखिल भारतीय काँग्रेस महासमितीने नंतर मान्यता दिली; तरीही काँग्रेसच्या अनेक नेत्यांना व कार्यकर्त्यांना गांधीजींचा हा निर्णय आवडला नाही. हा जनतेच्या उत्साहाचा अवसानघात करणे होय अशी टीका गांधीजींवर करण्यात आली. त्याचबरोबर देशव्यापी चळवळीत एखाद्या ठिकाणी हिंसक घटना घडल्यामुळे संपूर्ण चळवळ रद्द करणे योग्य नव्हे असे प्रतिपादन गांधीजींचा निर्णय मान्य नसणाऱ्यांनी केले. यामध्ये मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय, चित्तरंजन दास आदी मंडळींचा समावेश होता. असहकार चळवळीत तोपावेतो सरकारने गांधीजींना अटक केली नव्हती; परंतु चळवळ मागे घेण्याच्या निर्णयामुळे गांधीजींवर होत असलेल्या टीकेमुळे निर्माण झालेल्या वातावरणाचा फायदा घेऊन शासनाने त्यांना १० मार्च, १९२२ रोजी अटक केली.

चळवळ स्थगित करण्यामागे गांधीजींची भूमिका अशी होती की, असहकार चळवळीला हिंसक वळण मिळण्याचा धोका चौरीचौरा येथील घटनेने निर्माण झाला होता. त्याचबरोबर भारतीय जनता अहिंसक आंदोलनासाठी मानसिकदृष्ट्या पूर्णपणे तयार झाली नाही, असेही त्यांना दिसून आले होते आणि नि:शस्त्र जनतेच्या हिंसक कृत्यांना शासन पाशवी बळाने दडपून टाकील आणि ज्याला तोंड देणे सामान्य माणसाला अवघड होईल आणि त्यातून पुन्हा चळवळ उभी राहणे अवघड होऊ शकेल. या हेतूने आंदोलन अहिंसक राहिले पाहिजे असा गांधीजींचा आग्रह होता.

### गांधीजींवरील खटला

ब्रिटिश शासनाने गांधीजींवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांच्यावर मार्च, १९२२ मध्ये खटला दाखल केला. गांधीजींनी स्वत: बचाव न करता आपल्या कृत्याचे समर्थन केले. असहकाराच्या चळवळीद्वारे ब्रिटिश सत्तेला त्यांनी विरोध का केला याचे विवेचन त्यांनी न्यायालयात केले. याबाबत गांधीजींची भूमिका अशी होती की, ब्रिटिशांच्या राजवटीत भारतीयांवर अत्याचार व अन्याय होत आहे; त्यांची अवनती होत आहे. जर या अन्यायाविरुद्ध आपण संघर्ष केला नाही तर आपण आपल्या कर्तव्यापासून दूर गेल्यासारखे होईल. गांधीजी असेही म्हणाले की, त्यांची सुटका झाल्यास पुन्हा ते चळवळीचा मार्ग स्वीकारतील. न्यायाधीशांनी त्यांना दोषी ठरवून सहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. शिक्षा देताना न्यायाधीश महोदयांनी लोकमान्य टिळकांनाही याच आरोपाखाली तितक्याच मुदतीची शिक्षा झाल्याचा उल्लेख केला. गांधीजींनी आपल्या शिक्षेच्या उत्तरात टिळकांच्या शिक्षेशी आपल्या शिक्षेचा संबंध जोडला गेला याबद्दल आपल्याला गौरव वाटतो असे उद्गार काढले.

### असहकार चळवळीचे मूल्यमापन

या चळवळीच्या प्रारंभी गांधीजींनी घोषणा केली होती की, ही चळवळ निष्ठेने राबविल्यास एका वर्षात स्वराज्य मिळेल; परंतु तसे घडले नाही. खिलाफत चळवळीची जोड असहकार चळवळीला दिल्याबद्दल गांधीजींवर टीका केली गेली. ज्या खिलाफतीसाठी मुस्लिमांनी चळवळ उभारली व काँग्रेसने तिला पाठिंबा दिला, ते खलिफापद तुर्कस्तानमध्ये सत्तेवर आलेल्या सत्ताधाऱ्यांनी नष्ट केले; तसेच ज्या हिंदु-मुस्लीम ऐक्यासाठी खिलाफत चळवळ व असहकार चळवळ गांधीजींनी एकत्र केली त्या ऐक्याला चळवळ संपताना तडे गेले होते. विशेषत: खिलाफत चळवळीत कट्टर धर्मनिष्ठ मुस्लिमांचा प्रभाव होता. त्यातून धार्मिक कट्टरता भडकावली जाऊन

केरळमधील मलबार भागातील मोपला मुस्लिमांनी हिंदूंवर जाळपोळ, हत्या, हल्ले केले; त्यामुळे हिंदु-मुस्लीम संघर्ष होत राहिला. याबाबतीत असहकार चळवळ अपयशी ठरली; तरीही काही बाबतींत चळवळ यशस्वी ठरली होती.

(१) **चळवळ समाजव्यापी बनली** : पहिल्यांदाच राजकीय चळवळ देशव्यापी स्तरावर चालविली गेली आणि ही चळवळ सामान्य जनतेपर्यंत जाऊन पोहोचली. महिला, विद्यार्थी, कामगार, शेतकरी, दुकानदार, व्यापारी, सुशिक्षित, पांढरपेशा वर्ग अशा समाजातील विविध वर्गांतील लोकांनी चळवळीत भाग घेतला. या चळवळीची व्याप्ती भारतातील बऱ्याच प्रांतांपर्यंत जाऊन पोहोचली. या अर्थाने ही चळवळ राष्ट्रव्यापी होती. आतापर्यंत हे सर्व घटक चळवळीत आले नव्हते. विशेषत: ग्रामीण भागातील जनतेचा सहभाग हा नवीन बदल होता.

(२) **जनता निर्भय बनली** : शासनाच्या शक्तीबद्दल, शासनाकडून केल्या जाणाऱ्या लाठीमार, गोळीबार, तुरुंगवास इत्यादींबद्दल जनतेच्या मनात भीती उरली नाही. उलट जनतेने शासकीय दडपशाहीला धैर्याने तोंड दिले. शासनाने कितीही बळ वापरून चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला तरी तो सहन करण्याची शक्ती जनतेत आली आहे हे या चळवळीने दाखवून दिले.

(३) **प्रत्येक घटकासाठी योग्य कार्यक्रम** : गांधीजींच्या चळवळीचे हे वैशिष्ट्य होते की, समाजातील प्रत्येक घटकाला अमलात आणता येईल असा एक कार्यक्रम त्यांनी जनतेला दिला. परदेशी कापडाची होळी, प्रभातफेऱ्या, हरताळ, सामुदायिक प्रार्थना, दारूच्या व परदेशी कापडाच्या दुकानांसमोरील निदर्शने, साराबंदी, खादीची निर्मिती व प्रसार, ग्रामसुधार इत्यादींसारख्या कार्यक्रमांतून ते विद्यार्थी, शेतकरी, महिला इत्यादी घटक त्यांना योग्य असे कार्यक्रम ते स्वीकारू शकत होते.

सध्येन स्वातंत्र्याची शपथ घेण्यासाठी पुढे आले.

## सविनय कायदेभंगाची चळवळ

सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय जरी लाहोर येथील काँग्रेसच्या अधिवेशनात घेण्यात आला असला, तरी ती केव्हा आणि कशी सुरू करावी याबद्दलचे अधिकार गांधीजींना देण्यात आले होते. या संदर्भात गांधीजींनी व्हाइसरॉय आयर्विन यांना पत्र लिहून अकरा मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या होत्या. त्या मागण्या शासनाने मान्य केल्यास सविनय कायदेभंगाची चळवळ होणार नाही आणि काँग्रेस गोलमेज परिषदेत भाग घेईल असे आश्वासन गांधीजींनी दिले. आयर्विनला लिहिलेल्या पत्रात गांधीजींनी पुढील मागण्यांचा उल्लेख केला होता. त्यात दारुबंदी, जमीन महसुलात पन्नास टक्के कपात करणे, परदेशी कापडावर आयात कर लावला जावा, मिठावरील कर रद्द केला जावा, राजकीय बंद्यांची मुक्तता केली जावी, संरक्षण खात्यावरील खर्चात पन्नास टक्के कपात केली जावी, बड्या सनदी नोकरांच्या पगारात कपात केली जावी इत्यादी मागण्या प्रमुख होत्या. गांधीजींच्या पत्राकडे आयर्विन यांनी लक्ष दिले नाही; त्यामुळे चळवळ सुरू करण्याशिवाय काँग्रेससमोर पर्याय उरला नव्हता. गांधीजींनी केलेल्या मागण्या बहुसंख्य लोकांच्या जीवनाशी निगडित आणि परिणाम करणाऱ्या होत्या; यामुळे जनतेची सहानुभूती, पाठिंबा व सक्रिय सहभाग चळवळीला मिळाला.

### देशातील असंतोषाची स्थिती

यावेळी देशातील स्थिती चळवळीला अनुकूल होती; कारण जनतेमध्ये विविध कारणांनी ब्रिटिश शासनाबद्दल असंतोष होता. इ. स. १९२९ च्या जागतिक आर्थिक मंदीचे परिणाम भारतावरही झाले होते. कामगार चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारने कायदे तयार केले होते. त्याविरुद्ध भगतसिंग व बटुकेश्वर दत्त या क्रांतिकारकांनी आवाज उठविला होता. लाला लजपतराय यांच्यावरील लाठीहल्ल्यानंतर काही दिवसांतच त्यांचा मृत्यू झाला होता. या लाठीमारात हात असलेल्या सॉंडर्स या ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या करण्यात आली होती. या हत्येच्या आरोपावरून भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फाशीची शिक्षा देण्यात आली होती. शेतीमालाला किंमत नव्हती व उलट सरकारने महसूल वाढविला होता. या कारणाने शेतकऱ्यांत असंतोष होता. कम्युनिस्ट पक्षाच्या (साम्यवादी) काही नेत्यांवर राष्ट्रद्रोहाचा आरोप ठेवून त्यांच्यावर खटला चालवला. हा खटला मीरत कटाचा खटला म्हणून ओळखला जातो. क्रांतिकारकांच्या शासनविरोधी हालचाली देशभर, विशेषत: बंगालमध्ये सुरू होत्या.

काँग्रेस कार्यकारिणीने अहमदाबादजवळील साबरमती आश्रमात फेब्रुवारी, १९३० मध्ये झालेल्या बैठकीत सविनय चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. सत्याग्रहाची चळवळ केव्हा व कशी सुरू करावयाची हे ठरविण्याचा संपूर्ण अधिकार गांधीजींना देण्यात आला. असहकार चळवळीप्रमाणे या वेळीही समाजाच्या विविध स्तरांतील लोकांना चळवळीत भाग घेण्याचे आवाहन केले होते; मात्र चळवळीत सहभागी होणाऱ्या सत्याग्रहींची अहिंसेवर श्रद्धा असणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करण्यात आले होते.

### मिठाचा सत्याग्रह

२ मार्च, १९३० रोजी गांधीजींनी व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांना पुन्हा एक पत्र लिहून आपण गुजरातमधील दांडी येथे मिठाचा कायदा मोडून कायदेभंग करणार आहोत आणि शासनाला ही चळवळ टाळावयाची असेल तर त्यांनी आमच्या मागण्या मान्य कराव्यात असे कळविले. या मागण्या गांधीजींनी आपल्या पहिल्या पत्रात मांडल्या आहेत. या पत्राला आयर्विन यांनी उत्तर दिले आणि त्यात एवढेच नमूद केले की, 'गांधीजींनी कायदेभंग करून

शांतताभंग करू नये.' गांधीजींनी व्हाइसरॉयशी केलेला पत्रव्यवहार व आपल्या काही मागण्या मान्य केल्यास चळवळ मागे घेण्याची तयारी दाखववावी हे काँग्रेसच्या काही तरुण नेत्यांना आवडले नाही; परंतु विशिष्ट मागण्यांच्या आधारे चळवळ करावयाची, त्यांपैकी काही मागण्या मान्य झाल्यास ती चळवळ मागे घेण्याची तयारी ठेवावयाची असे गांधीजींचे धोरण होते. मान्य न होणाऱ्या मागण्यांसाठी चळवळ केल्यास आणि त्यातून अपयश आल्यास जनतेचा तेजोभंग होतो, आणि तसे होऊ नये अशी गांधीजींची इच्छा होती.

फेब्रुवारीच्या मध्यात काँग्रेस कार्यकारी समितीची बैठक साबरमती येथील गांधीजींच्या आश्रमात झाली आणि या बैठकीत सविनय कायदेभंगाचा निर्णय घेण्यात आला. व्हाइसरॉयकडून गांधीजींच्या मागण्यांना नकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे हा निर्णय घेण्याशिवाय पर्याय उरला नव्हता. कायदेभंगाची चळवळ गांधीजींच्या नेतृत्वाखाली अहिंसक मार्गाने सुरू करण्यात यावी असा निर्णय कार्यकारिणीने आपल्या बैठकीत घेतला. त्याच वेळी ब्रिटिश शासनाला कोणत्याही प्रकारे सहकार्य करू नये आणि चळवळीत भाग घ्यावा असे आवाहन कार्यकारिणीने जनतेला केले.

गांधीजींनी कायदेभंगाच्या चळवळीचा प्रारंभ करण्यासाठी गुजरातमधील समुद्रकिनाऱ्यावरील दांडी या गावी जाऊन मिठाचा कायदा मोडण्याचा निर्णय घेतला. कायदेभंगासाठी मिठाची निवड करण्यामागे कारण असे होते की, मीठ ही प्रत्येक व्यक्तीला आवश्यक असलेली वस्तू होती. गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांना लागणाऱ्या या वस्तूचे प्रमाण सारखेच होते; म्हणूनच श्रीमंतांच्या तुलनेत सामान्य माणसाला मिठावरील प्रचंड कराचा बोजा सहन करावा लागत होता; यामुळेच सामान्य व्यक्ती मिठाशी संबंधित चळवळीमुळे प्रभावित होण्याची शक्यता बरीच होती; तसेच मीठ तयार करण्याची मक्तेदारी सरकारकडे होती. त्याचबरोबर कायदेभंगामागे गांधीजींची अशी भूमिका होती की, ब्रिटिश शासन हेच मुळात अनैतिक असल्यामुळे त्यांचे अन्यायी कायदे पाळण्याचे बंधन भारतीयांवर नाही; म्हणून अशा कायद्यांचा भंग करण्याचा अधिकार भारतीयांना आहे. मात्र अशा कायदेभंगासाठी होणारी शिक्षा सत्याग्रहीने स्वीकारावी असे गांधीजींचे मत होते.

**दांडी यात्रा**

१२ मार्च, १९३० रोजी गांधीजी आपल्या सहकाऱ्यांसह अहमदाबादजवळील साबरमती आश्रमातून निघून सुमारे ३८५ किलोमीटर अंतरावरील समुद्रकिनाऱ्यावरील दांडी या गावी जाण्यासाठी निघाले. या पदयात्रेत गांधीजींनी मार्गावरील गावांमधून भाषणे केली. या भाषणांमुळे केवळ देशातीलच नव्हे तर परदेशांतील लोकांचेही लक्ष या सविनय कायदेभंगाच्या चळवळीकडे गेले. कायदेभंगाचा संदेश सर्वत्र पसरत गेला. गांधीजी दांडी येथे ५ एप्रिल रोजी पोहोचले. दुसऱ्या दिवशी, म्हणजे ६ एप्रिलला गांधीजींनी मीठ उचलून मिठाचा कायदा मोडला. अशा रीतीने कायदेभंगाला सुरुवात झाली. जिथे समुद्रकिनारा नव्हता अशा ठिकाणी इतर प्रांतांत विविध कायद्यांचा भंग केला गेला. मध्य प्रदेश, मुंबई प्रांतांत जंगल कायद्यांचा भंग करून झाडे तोडण्यात आली. गुजरात, उत्तर प्रदेश व बंगाल-मधील मिदनापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांनी शेतसारा देण्यास नकार दिला आणि साराबंदीची चळवळ सुरू केली. काही ठिकाणी अशाच प्रकारे विविध कर देण्यास जनतेने नकार दिला. वायव्य सरहद्द प्रांतात खान अब्दुल गफारखान यांनी आपल्या पठाण अनुयायांसह चळवळीत भाग घेतला. त्यांची खुदा-इ-खिदमतगार ही संघटना त्या भागात प्रभावी होती. या प्रदेशात शेतकऱ्यांच्या उग्र निदर्शनावर गोळीबार करण्याचा हुकूम जेव्हा ब्रिटिश अधिकाऱ्यांनी दिला तेव्हा सैन्याच्या गढवाल रायफल्स् पलटणीचे प्रमुख चंदनसिंग गढवाली यांनी गोळीबार करण्यास नकार दिला. या घटनेवरून स्पष्ट होते की, भारतीय सैनिकसुद्धा स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रभावित झाले होते आणि त्यांना चळवळीबद्दल आस्था होती. बिहारमधील भागलपूर, मोंघीर इत्यादी जिल्ह्यांत शेतकऱ्यांनी आणि बंगालमध्येही शेतकऱ्यांनी कर देण्यास नकार दिला. गुजरातमधील खेडा जिल्ह्यात आणि सुरत जिल्ह्यातील बार्डोली तालुक्यात

व इतर काही ठिकाणी साराबंदीची चळवळ चालवली. बार्डोलीत याचे नेतृत्व सरदार वल्लभभाई पटेल यांनी केले. आंध्र प्रदेश, पंजाब या प्रांतांतसुद्धा ही चळवळ पसरली.

**गांधीजींच्या अटकेचे पडसाद**

सविनय कायदेभंगाच्या चळवळीत महाराष्ट्रातील जनतेने मोठ्या प्रमाणात भाग घेतला. मे, १९३० मध्ये गांधीजींना अटक करण्यात आली. अटकेचे पडसाद देशभर उमटले. निषेध– सभा, संप, हरताळ, बहिष्कार, कायदेभंग इत्यादी मार्गांनी भारतीय जनतेने आपला असंतोष व्यक्त केला. महाराष्ट्रात सोलापूर येथे गांधीजींच्या अटकेच्या निषेधार्थ सार्वत्रिक हरताळ व गिरणी कामगारांचा संप झाला. दारूच्या दुकानांना आगी लावण्यात आल्या, शासनाच्या निषेधार्थ मिरवणुका काढण्यात आल्या. सोलापूरच्या कलेक्टरने गोळीबार केला; परंतु परिस्थिती आटोक्यात न आल्यामुळे शहरात 'मार्शल लॉ' म्हणजे 'लष्करी कायदा' पुकारण्यात आला. सोलापूर उठावात भाग घेणाऱ्यांपैकी काहीजणांना विविध मुदतींच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या, तर मल्लाप्पा धनशेट्टी, श्रीकृष्ण सारडा, जगन्नाथ शिंदे व कुर्बान हुसेन या चौघांना फाशीची शिक्षा देण्यात आली. सविनय कायदेभंग चळवळीतील कामगारांच्या सहभागाचे एक उदाहरण म्हणून 'सोलापूर मार्शल लॉ' या घटनेकडे पाहता येईल; कारण सोलापूरला गिरणी कामगारांची संख्या लक्षणीय होती.

सुरत जिल्ह्यात धारासना येथे मिठाचा सत्याग्रह करण्याचा मनोदय गांधीजींनी दांडी सत्याग्रहानंतर व्यक्त केला होता; परंतु तत्पूर्वीच गांधीजींना अटक करण्यात आली होती. त्यानंतर नेते म्हणून सत्याग्रहासाठी अब्बास तय्यबजी आले; परंतु त्यांनाही अटक करण्यात आली. त्यानंतर या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडूंकडे आले. धारासनाकडे येणारे सर्व मार्ग रोखून धरल्यानंतरही काही सत्याग्रही धारासनात पोहोचले आणि २१ मे रोजी सत्याग्रहींची तुकडी मिठागाराकडे निघाली. पोलिसांनी अमानुषपणे सत्याग्रहींना रक्तबंबाळ होईपर्यंत मारले तरीही दुसरी तुकडी तिकडे मिठाचा कायदेभंग करण्यासाठी गेली. त्यांनाही पोलिसांचा लाठीमार सहन करावा लागला; तरीही सत्याग्रहींनी प्रतिकार न करता, पोलिसांचा अत्याचार सहन केला. मुंबईत वडाळा या ठिकाणी असाच मिठाचा सत्याग्रह करण्यात आला.

मिठाबरोबरच महाराष्ट्रात जंगल सत्याग्रह करण्यात आला. यापैकी सातारा जिल्ह्यात बिळाशी, नाशिक जिल्ह्यात कळवण, नगर जिल्ह्यात अकोले व संगमनेर, रायगड जिल्ह्यात चिरनेर, विदर्भात पुसद, चंद्रपूर जिल्ह्यात लोहारा येथे झालेले जंगल सत्याग्रह महत्त्वाचे होते.

शहरांपासून खेड्यांपर्यंत पसरलेली ही चळवळ मोडण्यासाठी शासनाने कठोरपणे अनेक निर्बंध जनतेवर लादले आणि अत्याचार केले. यामध्ये सत्याग्रहींवर लाठीमार करणे, तुरुंगात आणि पोलीस कोठडीत सत्याग्रहींना शारीरिक यातना देणे, गोळीबार करणे, घरेदारे जाळणे, मालमत्ता जप्त करणे, सभा-मिरवणुकांवर बंदी घालणे इत्यादी मार्गांचा समावेश होता. वृत्तपत्रांवर बंधने घालून चळवळीच्या बातम्या पसरू न देण्याचा प्रयत्नही शासनाने केला. या चळवळीत अटक झालेल्या सत्याग्रहींची संख्या पंच्याहत्तर हजारांवर होती. सविनय कायदेभंगाबरोबरच क्रांतिकारकांनीही आपली चळवळ सुरू ठेवली होती. यांपैकी बंगालमधील सूर्यसेन व त्यांच्या सहकाऱ्यांनी चितगाव येथील शस्त्रागारावर घातलेली धाड व ब्रिटिश शासनाशी दिलेला लढा उल्लेखनीय आहे.

## चळवळीची वैशिष्ट्ये व परिणाम

**आर्थिक परिणाम**

इ. स. १९३०–३१ मधील सविनय कायदेभंगाची चळवळ स्वातंत्र्याच्या आंदोलनातील दुसरी महत्त्वाची चळवळ होती. या चळवळीमुळे इंग्लंडमधून भारतात आयात होणाऱ्या कापडामध्ये निम्म्याने घट झाली; कारण विदेशी कापडावरील बहिष्कार हा चळवळीचा एक भाग होता. शासनाला दारूपासून मिळणाऱ्या कराच्या

उत्पन्नातही घट झाली; कारण सविनय कायदेभंगाच्या चळवळीत महिला कार्यकर्त्यांनी दारू दुकानांसमोर निदर्शनाचा कार्यक्रम हाती घेतला होता. शेतकऱ्यांच्या साराबंदीच्या चळवळीमुळे जमीन महसुलातून मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम झाला होता.

### चळवळ व्यापक बनली

समाजाच्या विविध स्तरांतील लोक या चळवळीत सामील झाले व राष्ट्रवादाने प्रभावित झाले. शहरात व्यापारी, दुकानदार, विद्यार्थी चळवळीत प्रभावी होते, तर शेतकरी, वनवासी इत्यादी वर्ग ग्रामीण भागात प्रभावी होते. ही चळवळ गुजरात, बंगाल, आंध्र, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक व उत्तर प्रदेशात प्रभावी होती. मुंबई, कोलकातासारख्या महानगरांत कामगारांनी चळवळीत भाग घेतला. मुंबईच्या कापड गिरणीतील बाबू गेनूसारख्या कामगाराने विदेशी कापडाने भरलेल्या ट्रकला अडविण्यासाठी आत्मबलिदान केले. यावरून कामगारांमध्ये चळवळीच्या प्रभावाची कल्पना येते. अशिक्षित व राजकीयदृष्ट्या प्रगत नसलेल्या लोकांनी या चळवळीत भाग घेतल्याबद्दल ब्रिटिश शासनाला आश्चर्य वाटले.

सविनय कायदेभंग चळवळीत महिलांचा सहभाग लक्षणीय होता. ध्वजासह प्रभातफेऱ्या काढणे, दारूची दुकाने, विदेशी कापड व इतर विदेशी वस्तूंच्या दुकानांसमोर निदर्शने करणे इत्यादी कार्यक्रमांत शहरातील महिलांनी प्रामुख्याने भाग घेतला, तर ग्रामीण भागात जंगल सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह इत्यादी कार्यक्रमांत त्यांनी भाग घेतला. घरापुरते मर्यादित कार्यक्षेत्र असलेल्या स्त्रीला या चळवळीने राष्ट्रीय आंदोलनात आणले.

असहकाराच्या चळवळीच्या तुलनेने ही चळवळ अधिक व्यापक होती. सरकारी दडपशाहीला न घाबरता सरकारला कर न देण्याचे धैर्य शेतकऱ्यांनी दाखविले. लाठीमार, गोळीबार, तुरुंगवास यांना न घाबरता चळवळीत भाग घेण्याचे धैर्य जनतेत निर्माण झाले होते. लुई फिशर यांनी या चळवळीचे मूल्यमापन करताना असे लिहिले की, 'अमानुष जुलमाच्या जोरावर ब्रिटिशांनी भारताला पारतंत्र्यात जखडून ठेवले आहे. भारतीय लोक निर्भयपणे, स्वाभिमानाने व ताठ मानेने उभे राहिले तर आपल्या खांद्यावरील ब्रिटिश साम्राज्याचे जोखड ते सहजपणे झुगारून देऊ शकतील, याची जाणीव गांधीजींनी ब्रिटिशांना व भारतीयांना करून दिली.' या चळवळीने हे स्पष्ट केले की, भारतीय जनता स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट निश्चितच साध्य करील, प्रश्न फक्त काळाचाच होता.

## 'छोडो भारत' आंदोलन (१९४२)

क्रिप्स इंग्लंडला परत गेल्यानंतर राजकीय क्षेत्रात एक प्रकारची निराशा आणि राजकीय कोंडी निर्माण झाली. जपानी आक्रमणापुढे ब्रिटिश सत्तेला हादरे बसत होते. पूर्वेकडील देशात जपानने मिळविलेल्या विजयाचे भारतीय जनतेने स्वागत केले. ब्रिटिश सत्तेला भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न सोडवावयाचा नव्हता हे स्पष्ट झाले होते. क्रिप्सची भेट ही केवळ फसवी चाल होती हे काँग्रेस नेत्यांना उमगले होते. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी गांधीजींनी पुन्हा एकदा व्यापक जन-आंदोलनाचा प्रारंभ करण्याचे ठरविले. स्वातंत्र्याची चळवळ तीव्र करण्याचा हेतू या चळवळीमागे होता. ही चळवळ म्हणजेच 'छोडो भारत' किंवा 'चले जाव' चळवळ होय. या चळवळीची पार्श्वभूमी आणि कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

### गांधीजींची भूमिका

क्रिप्स वाटाघाटींच्या असफलतेनंतर गांधीजींनी एकदम निर्णायक भूमिका घेतली. ब्रिटिश शासकांनी ताबडतोब भारत सोडून जावे असे स्पष्ट मत गांधीजींनी व्यक्त केले. आपल्या 'हरिजन' या वृत्तपत्रातून त्यांनी लिहिलेल्या लेखांचा सारांश असा होता की, 'जपान भारतावर आक्रमण करण्याची शक्यता केवळ ब्रिटिशांच्या येथील सत्तेमुळेच आहे; कारण जपानची लढाई इंग्लंडविरुद्ध आहे, जपानचे भारताशी शत्रुत्व नाही; तेव्हा ब्रिटिश शासकांनी भारतावरील आपली सत्ता सोडून दिल्यास जपानच्या भारतावरील आक्रमणाचा धोका आपोआपच टळणार आहे. भारतीयांना त्यांच्या नशिबावर सोडून देऊन इंग्रजांनी भारतातून चालते व्हावे. भविष्यात जपानकडून होणारा संभाव्य पराभव टाळण्यासाठी इंग्लंडने भारतातून माघार घेणे इष्ट.' याही पुढे जाऊन मे, १९४२ मध्ये आपल्या लेखात गांधीजींनी असे मत व्यक्त केले की, 'ब्रिटिश शासकांनी भारतातून निघून जाण्याची वेळ आली आहे आणि या कार्याच्या सिद्धीसाठी माझी सर्व शक्ती पणाला लावण्याची वेळ आली आहे. स्वतंत्र भारत त्याच्यावरील (जपानच्या) आक्रमणाला तोंड देऊ शकेल.' आपल्या आणखी एका लेखात गांधीजींनी लिहिले की, ब्रिटिशांनी भारतीयांना देवाच्या स्वाधीन करून भारतातून जावे. त्यातून अराजक काही काळ भारतात निर्माण झाले तरी शेवटी खरा व समर्थ भारत यातून उदयाला येईल. त्यांनी आग्रहाने असे मत व्यक्त केले की, 'परकीय सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न भारतीय जनतेने आजवर अहिंसक मार्गांनी केला; परंतु आता माझी भूमिका बदलली आहे. यापुढे मी वाट पाहू शकत नाही. तशी वाट पाहावयाची ठरविली तर जगाच्या अंतापर्यंत मला वाट पाहावी लागेल.' यासाठी धोका पत्करून का होईना पण गुलामगिरीला विरोध केला पाहिजे असा गांधीजींचा निर्धार होता. थोडक्यात, ब्रिटिश शासक सत्तांतर कधी करतील याची वाट पाहण्यास गांधीजी तयार नव्हते.

### वर्धा ठरावातील मुद्दे

१४ जुलै, १९४२ रोजी वर्धा येथे काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली. यात संकल्पित चळवळीसंबंधाने प्रदीर्घ ठराव पारित करण्यात आला. यात महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे होते–

(१) भारतातील ब्रिटिश सत्तेचे उच्चाटन ताबडतोब झाले पाहिजे. याचाच अर्थ ब्रिटिशांनी भारतातील आपली सत्ता संपुष्टात आणली पाहिजे.

(२) भारतातील जातीय समस्या (हिंदु-मुस्लीम प्रश्न) सोडविण्यात ब्रिटिश सत्तेचा अडसर सदैव राहिलेला आहे. ब्रिटिश सत्ता भारतातून गेल्यावर तो प्रश्न परस्पर चर्चा व सामंजस्याने सुटू शकेल.

(३) ब्रिटिश शासकांनी भारतातून तात्काळ चालते व्हावे असा काँग्रेसचा आग्रह आहे; परंतु असे सांगताना ब्रिटिश शासकांच्या युद्धातील अडचणींत भर टाकण्याची किंवा त्यांची बाजू कमकुवत करण्याची काँग्रेसची इच्छा नाही; म्हणून काँग्रेस प्रामाणिकपणे हे सांगू इच्छिते की, ब्रिटिश शासकांनी जपानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी व चीनचे संरक्षण करण्यासाठी भारतात आपले सैन्य ठेवण्यास हरकत नाही.

(४) परंतु भारत सोडून जाण्यास ब्रिटिश शासकांनी नकार दिल्यास काँग्रेसला नाईलाजाने एक व्यापक चळवळ हाती घेणे भाग पडेल, ज्याचे नेतृत्व गांधीजी करतील.

**ब्रिटिश शासनाचे धोरण**

काँग्रेस कार्यकारिणीच्या १४ जुलै, १९४२ च्या ठरावावर ब्रिटिश शासनाची प्रतिक्रिया कठोर व पूर्णपणे विरोधाची होती. युद्ध संपेपर्यंत अशा कुठल्याही प्रकारच्या राजकीय चळवळीला सहन करण्याचे शासनाचे धोरण नव्हते. युद्धकाळात चळवळ सुरू करून इंग्लंडला अधिक संकटात टाकण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे असे ब्रिटिश राज्यकर्त्यांना वाटत होते. गांधीजींच्या एक शिष्या मीराबेन (कु. स्लेड) यांनी व्हाइसरॉयची जेव्हा भेट मागितली तेव्हा ती नाकारण्यात आली. चळवळ सुरू झाल्यास ती चिरडून टाकण्याची सर्व तयारी शासनाने केली होती.

**'भारत छोडो'ची घोषणा**

काँग्रेसच्या अखिल भारतीय महासमितीचे अधिवेशन मुंबईला ७ ऑगस्ट, १९४२ रोजी सुरू झाले. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी मौलाना अब्दुल कलाम आझाद हे होते. १४ जुलैच्या काँग्रेस कार्यकारिणीच्या ठरावावर या अधिवेशनात चर्चा होऊन त्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार होता. त्याप्रमाणे सात आणि आठ ऑगस्टला मुंबई येथे गवालिया टँक मैदानावर भरलेल्या महासमितीच्या अधिवेशनात काँग्रेस कार्यकारिणीचा १४ जुलैचा ठराव विचारात घेऊन ब्रिटिशांनी भारत सोडून जावे अशी मागणी करणारा 'भारत छोडो' ठराव पास करण्यात आला. ठरावात असे नमूद करण्यात आले की, स्वतंत्र भारत दोस्त राष्ट्रांना युद्धात मदत करेल. याचाच अर्थ इंग्लंडने भारताला स्वातंत्र्य द्यावे अशी मागणी भारताने ठरावाद्वारे केली; तसेच या ठरावात गांधीजींच्या नेतृत्वाखाली अहिंसक जनआंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. ठरावात असेही नमूद करण्यात आले की, ब्रिटिशांकडून हस्तांतरित केली जाणारी सत्ता सर्व भारतीयांसाठी असेल.

आठ ऑगस्ट रोजी गांधीजींनी अधिवेशनाला जमलेल्या जनसमुदायासमोर भाषण केले. त्यात त्यांनी हिंदु-मुस्लीम मतभेद दूर करून समाजातील सर्व स्तरांतील लोकांनी भाग घ्यावा असे आवाहन केले. हा लढा स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी असून त्यासाठी कोणतेही अत्याचार सहन करण्याचीं आणि त्यागाची तयारी जनतेने ठेवावी असे गांधीजींनी आपल्या भाषणात सांगितले. भारतीयांनी या क्षणापासून स्वत:ला स्वतंत्र समजावे असे सांगून स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नात एक तर यशस्वी होऊ किंवा बलिदान देऊ, या भावनेने या अंतिम लढ्यात उतरण्याचे आवाहन गांधीजींनी भारतीयांना केले. यासंबंधाने 'करेंगे या मरेंगे' हा मंत्र त्यांनी जनतेला दिला; मात्र हा लढा ब्रिटिश जनतेविरुद्ध नसून ब्रिटिश सत्तेविरुद्ध आहे याची जाणीव गांधीजींनी भारतीय जनतेला करून दिली. आपल्या इतर लढ्यांप्रमाणेच हा लढा अहिंसक असावा ही गांधीजींची अपेक्षा होती. या लढ्याच्या कार्यक्रमात हरताळ, जमीन महसूल न देणे (जर जमीनदारांनी ब्रिटिश शासनाची बाजू घेतली तर), शासनाला कर न देणे इत्यादींचा समावेश होता; परंतु हा कार्यक्रम जनतेपुढे मांडण्यापूर्वीच काँग्रेसच्या प्रमुख आणि ज्येष्ठ नेत्यांना शासनाने अटक केली.

**शासनाची दडपशाही**

काँग्रेसच्या संकल्पित 'भारत छोडो' आंदोलनाला प्रारंभ होण्यापूर्वीच ते चिरडून टाकण्याचे ब्रिटिश शासनाने ठरविले होते. ९ ऑगस्टला गांधीजी प्रांतांत चळवळ कशी चालवावी याबद्दल मार्गदर्शन करणार होते; परंतु शासनाने त्यांना तशी संधी दिली नाही. त्याप्रमाणे ९ ऑगस्टच्या पहाटे शासनाने देशभरात काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना अटक केली. यामध्ये गांधीजी, जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद आणि इतरांचा समावेश होता. गांधीजींना पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये आणि जवाहरलाल नेहरू आणि काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात स्थानबद्ध केले. काँग्रेस महासमितीचे अधिवेशन आटोपून

आपल्या गावी परत जाणाऱ्या प्रांतिक स्तरावरील नेत्यांनाही अटक करण्यात आली. अटकसत्र केंद्रीय स्तरापासून गावाच्या स्तरापर्यंत सुरू ठेवण्यात आले. काँग्रेस पक्षावर आणि काँग्रेस पक्षाशी संलग्न असलेल्या इतर संघटनांवर बंदी घालण्यात आली. सभा, मोर्चे, निदर्शने इत्यादींवर बंदी घालण्यात आली. वृत्तपत्रांतून चळवळीचे वृत्त देशात पसरू नये यासाठी वृत्तपत्रांवर कडक बंधने घालण्यात आली. शासनाच्या अनुमतीशिवाय वृत्त छापण्यावर बंदी घालण्यात आली. अशा प्रकारे वृत्तपत्रांना शासनाच्या सेन्सॉरशिपला तोंड द्यावे लागले.

### जनतेचा लढा

जनतेला मार्गदर्शन करू शकतील आणि जनतेवर नियंत्रण ठेवून चळवळ चालवू शकतील अशा काँग्रेस पक्षाच्या सर्व नेत्यांना अटक करण्यात आल्यामुळे एक तर जनतेत शासनाविरुद्ध जो प्रक्षोभ होता तो उसळून आला आणि योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे प्रत्येकाने आपापल्या परीने या चळवळीत शासनाविरुद्ध असंतोष व्यक्त केला. शासनाविरुद्ध निषेधाच्या मिरवणुका, निदर्शने करण्यात आली. शासनाचे बंदीहुकूम मोडून हरताळ व निदर्शने करण्यात आली. पोष्टाची कार्यालये, पोलीस ठाणे, रेल्वे स्थानके, तार कार्यालये, रेल्वेमार्ग, पूल, रस्ते, संदेशवहन व्यवस्था (टेलिग्राफ ऑफिस), शासकीय कार्यालये, न्यायालये इत्यादींना ब्रिटिश शासनाचे प्रतीक मानून त्यांच्यावर हल्ले करण्यात आले, त्यांची तोडफोड व नासधूस करण्यात आली, तर काही ठिकाणी आगी लावण्यात आल्या; काही ठिकाणी शासकीय कार्यालयांवर काँग्रेसचा ध्वज फडकाविण्यात आला. अहमदाबाद, मुंबई, कानपूर, जमशेदपूर इत्यादी औद्योगिक शहरांत कामगार संपावर गेले. विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात चळवळीत भाग घेतला. उत्तर प्रदेश, बिहार, गुजरात, बंगाल, आसाम, पंजाब, महाराष्ट्र इत्यादी प्रांतांत चळवळीचा जोर विशेष होता. बॉम्बस्फोटाद्वारे शासकीय कार्यालये व शासकीय यंत्रणा उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जुलमी शासकीय अधिकाऱ्यांवर आणि निदर्शकांवर अत्याचार करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर हल्ले करण्यात आले. पोलीस ठाण्यातून शस्त्रे पळविण्यात आली तर काही ठिकाणी शस्त्रास्त्रांचे छोटे कारखाने काढण्यात आले. स्फोटके मिळविण्यात आली. तुरुंगावर हल्ले करून राजकीय कैद्यांची (राजबंद्यांची) सुटका करण्यात आली. सैन्य व पोलिसांशी कामगार, तरुण व क्रांतिकारकांनी उघड सशस्त्र संघर्ष केला. शासनयंत्रणेतील काहींनी चळवळीतील लोकांना विविध प्रकारे मदत केली.

### भूमिगत चळवळ

प्रारंभी जनतेने मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे चळवळीत भाग घेतला; परंतु सहा-सात आठवड्यांनंतर सरकारच्या दडपशाहीपुढे चळवळीचा पहिला भर ओसरला. त्यानंतर काँग्रेसमधील समाजवादी गटाने पुढाकार घेऊन ही चळवळ पुढे सुरू ठेवली. यांमध्ये जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफ अली, सुचेता कृपलानी आणि इतरांचा समावेश होता. या नेत्यांनी भूमिगत राहून चळवळ संघटित केली व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

भूमिगत चळवळीत गुप्तपत्रके काढून त्यांच्या प्रती अनेक ठिकाणी वाटल्या जात. या पत्रकांत चळवळीमध्ये घडत असलेल्या घटनांची माहिती दिली जाई. प्रत्येक विभागात भूमिगत कार्यकर्त्यांचा एक प्रमुख असे व त्याच्या अधिकाराखाली इतर कार्यकर्ते काम करीत असत. त्यांच्या वेगवेगळ्या कमिट्या असत, उदाहरणार्थ– प्रचार समिती, शस्त्रास्त्रे व दारूगोळा समिती, गुप्तहेरखाते इत्यादी. जयप्रकाश नारायण यांनी तुरुंगातून सुटका करून घेतली व भूमिगत राहून भूमिगत चळवळीतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यासाठी त्यांनी काही पुस्तिका तयार केल्या होत्या. भूमिगत कार्यकर्त्यांच्या एक गटाकडून मुंबईला एक रेडिओ केंद्र चालविले गेले, ज्या केंद्रावरून भूमिगत नेत्यांची भाषणे, बातम्या व देशभक्तिपर गीते प्रसारित केली जात. पुढे हे केंद्र चालविणाऱ्या उषा मेहता व विठ्ठल जव्हेरी यांना पोलिसांनी अटक केली. चळवळीतील नेत्यांनी प्रशासकीय यंत्रणा, संदेशवहन यंत्रणा आणि

दळणवळण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याच्या दृष्टीने कार्यकर्त्यांना घातपाती कारवाया करण्याबाबत मार्गदर्शन केले. जयप्रकाश नारायण यांच्या पुस्तिका याबाबत उपयुक्त होत्या. शस्त्रास्त्रे जमविली गेली व काही ठिकाणी शस्त्र चालविण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली. या केंद्रांतून शस्त्रास्त्रे चालविण्याबरोबरच स्फोटके वापरण्याबाबतही प्रशिक्षण दिले गेले. या कार्यात काही क्रांतिकारकांनीही भाग घेतला. भूमिगत चळवळीत काही विध्वंसक पथके व आझाद दस्ते तयार करण्यात आले होते. क्रांतिकारकांचा प्रभाव या चळवळीत उत्तर प्रदेश व बंगालमध्ये अधिक होता. यांमध्ये बिहारमधील सियाराम दल व परशुराम दल, उत्तर प्रदेशातील हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी, बंगालमधील अनुशीलन समिती इत्यादी क्रांतिकारी गट प्रमुख होते.

**ग्रामीण जनतेचा लढा**

शहरातील जनतेप्रमाणेच ग्रामीण भागातील जनतेनेही या चळवळीत भाग घेतला. सामान्य शेतकऱ्यापासून ते मोठ्या जमीनदारापर्यंत सर्वांचा चळवळीत समावेश होता. शेतकऱ्यांनी पोलिसांशी उघड-उघड संघर्ष केला. महाराष्ट्रातसुद्धा अमरावती जिल्ह्यातील यावली, चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर, अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी इत्यादी ठिकाणी दिलेले लढे संस्मरणीय आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांनी करबंदीची चळवळ केली, भूमिगत चळवळीतील कार्यकर्त्यांना आश्रय दिला, त्यांना मदत केली आणि काही वेळा चळवळीत भाग घेतला. शासन यंत्रणेच्या अवकृपेची भीती न बाळगता अशी कृत्ये करणे धाडसाचे काम होते. यावरून चळवळ ग्रामीण भागापर्यंत पोहोचली होती हे स्पष्ट होते.

**शासकीय अत्याचार**

इ. स. १९४२ ची चळवळ दडपून टाकताना ब्रिटिश शासकांनी भारतीय जनतेवर अत्याचार केले. पोलिसांबरोबर सैन्यालाही काही ठिकाणी बोलावले गेले. लाठीमार, गोळीबार यांबरोबरच पकडलेल्या आंदोलकांना शारीरिक यातना दिल्या गेल्या. यांत महिला, पुरुष व मुलांचाही समावेश होता. काही ठिकाणी स्त्रियांची विटंबना केली गेली. शासनाच्या अत्याचारांत शेकडो व्यक्ती मृत्युमुखी पडल्या, तर शेकडो जखमी झाले व अनेकजण कायमचे अपंग झाले. काही ठिकाणी आंदोलकांवर विमानातून गोळीबार करण्यात आला; काही ठिकाणी शासनाने जनतेकडून सामुदायिक दंड वसूल केला गेला. या चळवळीत शासकीय मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले.

**प्रतिसरकारे स्थापन झाली**

चळवळीच्या काळात भारतात काही विशिष्ट प्रांतांत आंदोलकांचा एवढा प्रभाव निर्माण झाला की, त्या भागात शासकीय अधिकाऱ्यांऐवजी आंदोलकांचीच सत्ता प्रस्थापित झाली. त्या भागातील जनतेने शासनाच्या आदेशापेक्षा या जनतेच्या समांतर किंवा प्रतिसरकारला अधिक महत्त्व दिले. जणू जनतेचे हे दुसरे सरकार होते! अशा प्रकारची प्रतिसरकारे महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यात, बंगालमध्ये मिदनापूर जिल्ह्यात तामलूक येथे, उत्तर प्रदेशात बालिया जिल्ह्यात, ओरिसा प्रांतातील बालासोर जिल्ह्यात इत्यादी ठिकाणी स्थापन झाली होती. सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकारचे प्रमुख क्रांतिसिंह नाना पाटील हे होते. हे सरकार 'पत्री सरकार' या नावाने ओळखले गेले. नाना पाटील यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा देण्यासाठी जनतेमधून सशस्त्र दले उभी केली. या दलांना 'तुफान सेना' आणि 'आझाद सेना' अशी नावे होती. जमीन महसूल गोळा करणे, जनतेतील तंट्यांचा न्याय-निवाडा करणे, गावांचे संरक्षण करणे इत्यादी कामे पत्री सरकार करीत असे. शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या व त्यांचे शोषण करणाऱ्या जमीनदार आणि सावकारांवर धाक बसवून पत्री सरकारने शेतकऱ्यांना न्याय दिला; तसेच या सरकारने पोलीस आणि दरोडेखोर या जनतेला छळणाऱ्या समाजातील घटकांना धाकात ठेवले. नाना पाटलांच्या सरकारचे एक वैशिष्ट्य असे होते की, सामाजिक सुधारणेचा कार्यक्रम त्यांनी सातारा जिल्ह्यात राबविला, ज्यात अस्पृश्यता निवारण, बालविवाहावर बंदी, साधेपणाने विवाह पार पाडणे, शिक्षणाचा प्रसार इत्यादींचा समावेश होता; तसेच त्यांनी स्त्रियांना भयमुक्त जीवन जगता येईल असे वातावरण निर्माण केले. नाना पाटील यांच्या पत्री सरकारने

गावोगावी स्थापन केलेल्या पंचायत समित्यांमधून गावातील तंटे सोडविले जात. जनतेचा पाठिंबा असलेले व एकाच वेळी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांत विधायक कार्य करणारे हे पत्री सरकार १९४६ पर्यंत अस्तित्वात होते. महाराष्ट्रातील या प्रतिसरकाराप्रमाणेच अन्य प्रांतांतील प्रतिसरकारांनी ब्रिटिश सत्तेला उघड आव्हान देऊन जनतेचे समांतर सरकार चालविले.

**चळवळीचे मूल्यमापन**

(१) **शेवटचे व्यापक जनआंदोलन** : १९४२ चे 'भारत छोडो' आंदोलन हे ब्रिटिश शासनाविरुद्धचे शेवटचे व्यापक जनआंदोलन होते. यानंतर असे आंदोलन झाले नाही; उलट सत्तांतराच्या प्रक्रियेला वेग आला आणि १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले; म्हणूनच या चळवळीचे महत्त्व वेगळे आहे. या चळवळीमुळे ब्रिटिश राज्यकर्ते ताबडतोब भारत सोडून गेले नसले तरी स्वातंत्र्याच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरले. ब्रिटिशांना त्यातून भारतीयांच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षेची आणि त्यासाठी केलेल्या निर्धाराची जाणीव झाली.

(२) **जीवित आणि वित्तहानी** : 'छोडो भारत' चळवळीच्या काळात पोलीस व लष्कराने केलेल्या गोळीबारात मारल्या गेलेल्या लोकांची संख्या हजारांपेक्षा अधिक होती. अटक केल्या गेलेल्या लोकांची संख्या पंच्याहत्तर हजारांपेक्षा अधिक होती. लक्षावधी रुपयांची शासकीय मालमत्ता नष्ट झाली. जीवितहानीबद्दलचे शासनाने प्रसिद्ध केलेले आकडे बरेच कमी होते.

(३) **चळवळीत सर्वांचा सहभाग** : या चळवळीत महिला, वकील, विद्यार्थी, शेतकरी, आदिवासी, कामगार, नोकरी करणारे लोक इत्यादी समाजातील विविध वर्गांतील व स्तरांतील लोकांचा समावेश होता. विविध प्रांतांत निर्माण झालेली प्रतिसरकारे ग्रामीण जनतेच्या आधारावरच उदयाला आली होती. महिलांनी व विद्यार्थ्यांनी यात विविध प्रकारे कामगिरी बजावली. समाजाच्या सर्व थरांतील लोकांचा सहभाग होता, या अर्थाने ही चळवळ व्यापक होती. सर्व प्रांतांत कमी-अधिक प्रमाणात चळवळ सुरू होती; यामुळे ती देशव्यापी होती असे म्हणता येईल.

(४) **जनतेचे धैर्य वाढले** : काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांच्या अटकेमुळे हे आंदोलन जनतेने आपल्या हाती घेतले आणि त्याला हिंसक वळण मिळाले. पोलीस व लष्कराशी आंदोलकांचा संघर्ष झाला. जनता 'करेंगे या मरेंगे' या भावनेने पेटून उठली होती. शासनाच्या दडपशाहीला तोंड दिल्यामुळे जनतेच्या मनातील शासकीय सामर्थ्याबद्दलचा दरारा उरला नाही. नेत्यांच्या अनुपस्थितीत आंदोलन चालविल्यामुळे जनतेचे मनोबल व धैर्य वाढले. ब्रिटिश शासनाबद्दलची निर्भयता शहरातील सुशिक्षितांप्रमाणेच ग्रामीण भागातील अशिक्षितांमध्येही निर्माण झाली होती.

(५) **शासकीय यंत्रणेची सहानुभूती** : शासकीय यंत्रणेतील काही भारतीयांची सहानुभूती या चळवळीला होती. शस्त्रास्त्रे व स्फोटके यांची ने-आण करणे, भूमिगत राहून कार्य करणे इत्यादी कामांत शासनातील विविध पदांवरील लोकांची मदत झाली. याचे कारण असे होते की, प्रत्येकाला आपल्या जीवावर उदार होऊन ब्रिटिश शासनाला आव्हान देणे शक्य नव्हते; म्हणून अशा व्यक्तींना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चाललेल्या चळवळीला अप्रत्यक्षपणे मदत केली. अर्थातच काहींनी शासकीय नोकऱ्यांचा त्याग करून आंदोलनात उडी घेतली.

(६) **ब्रिटिश सत्तेला हादरा बसला** : जरी ही चळवळ फार काळ चालली नाही आणि ती दडपण्यात ब्रिटिश शासनाला यश मिळाले, तरीही या चळवळीतील जनतेच्या संघटित सहभागामुळे शासनाला हादरा बसला. काँग्रेसच्या गांधीजी आणि इतर ज्येष्ठ नेत्यांच्या अटकेनंतर 'भारत छोडो' आंदोलन पसरणार नाही असे शासनाला वाटले होते, पण त्याबाबत शासनाचा अपेक्षाभंग झाला. चळवळीतून ब्रिटिश शासनाला भारतीय जनतेच्या मनातील असंतोषाची जाणीव प्रकर्षाने झाली. आज ना उद्या आपल्याला सत्ता सोडणे भाग पडणार आहे याची कल्पना त्यांना आली.

(७) **स्वातंत्र्याचा लढा तीव्र केला** : 'छोडो भारत' चळवळीने स्वातंत्र्यलढा तीव्र केला. यानंतर असे आंदोलन झाले नाही. सत्तांतरासाठी या चळवळीने पार्श्वभूमी तयार केली. पूर्ण स्वातंत्र्य ही एकमेव मागणी यानंतर भारतीय जनतेची राहिली आणि या मागणीची दखल ब्रिटिश शासनकर्त्यांना घ्यावी लागली. इ. स. १९४२ नंतर सत्तांतरासाठी वाटाघाटींची प्रक्रिया १९४७ पर्यंत म्हणजे स्वातंत्र्य मिळेपर्यंत सुरू राहिली. या चळवळीद्वारे बहुसंख्य भारतीयांनी स्वातंत्र्याची आकांक्षा जोरदारपणे व्यक्त केली होती. व्हाइसरॉय लिनलिथगो यांनी हे मान्य केले की, व्यापकता, गांभीर्य आणि महत्त्व यांचा विचार करता १८५७ च्या उठावानंतर १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीचा क्रम लागतो.

(८) **ब्रिटिश शासन व मुस्लीम लीगचे गठबंधन** : मुस्लीम लीगचे प्रमुख नेते जीना यांनी १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाला विरोध केला होता. ही चळवळ म्हणजे हिंदूंच्या हाती सत्ता मिळविण्यासाठी ब्रिटिश शासनाविरुद्ध लढा आहे अशी त्यांची भूमिका होती. ब्रिटिश शासकांनाही दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चळवळ सुरू करून त्यांना अडचणीत टाकणाऱ्या काँग्रेसपेक्षा मुस्लीम लीगबद्दल अधिक प्रेम होते. काँग्रेसच्या विरोधात जाऊन ब्रिटिश सत्तेला पाठिंबा व्यक्त करणाऱ्या मुस्लीम लीगबद्दल ब्रिटिश शासकांना सहानुभूती होती. याचे प्रत्यंतर सत्तांतराच्या वाटाघाटींच्या वेळी आले. भारताची फाळणी करून व पाकिस्तानची निर्मिती करून मुस्लीम लीगबद्दलच्या आपल्या जवळिकीचा पुरावा ब्रिटिश शासकांनी दिला. अशा रीतीने १९४२ च्या चळवळीमुळे ब्रिटिश शासक व मुस्लीम लीग हे अधिक जवळ आले. मुस्लीम लीगप्रमाणेच कम्युनिस्ट पक्षाची भारतातील नेतेमंडळी १९४२ च्या चळवळीपासून दूर राहिली.

**गांधीजींचे उपोषण व सुटका**

इ. स. १९४२ च्या चळवळीमधील हिंसाचाराबद्दल काँग्रेसला जबाबदार ठरवून त्याबद्दल एक अहवाल ब्रिटिश शासनाने फेब्रुवारी, १९४३ मध्ये प्रसिद्ध केला. गांधीजींनी तो अमान्य केला आणि तो आरोप मागे घ्यावा याबद्दल व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांच्याशी पत्रव्यवहार केला; परंतु व्हाइसरॉयने तो आरोप मागे घेतला नाही; तेव्हा गांधीजींनी स्थानबद्धतेतच उपोषण सुरू केले. या उपोषणानंतर शासनाने गांधीजींना ६ मे, १९४४ रोजी मुक्त केले. इ. स. १९४५ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीच्या इतर सदस्यांना तुरुंगातून मुक्त करण्यात आले आणि अशा रीतीने १९४२ च्या चळवळीचे पर्व संपुष्टात आले.